यवतमाळ दि. बुधवार १८ नोव्हेंबर २०२६

आजचे तापमान

कमाल	किमान
२८ से. °	२४ से. °

हवामानाचा अंदाज
थंड वातावरण

दैनिक लोकसूत्र

वर्ष - पाचवे • अंक १८२ • किंमत ३ रु. E-mail : Loksutra@gmail.com RNI NO.MAHMAR/2022/83119

नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा द्वारा संचालित



श्रीमती सुमित्राबाई ठाकरे कॉलेज ऑफ नर्सिंग

प्लॉट नं.पी.-३, एम.आय.डी.सी.एरिया, लोहारा, यवतमाळ

G.N.M. (3 वर्ष)
पात्रता : HSC (सायन्स, कॉमर्स, आर्ट) सायन्स विद्यार्थ्यांना प्राधान्य

A.N.M.(2 वर्ष)
पात्रता : HSC (सायन्स, कॉमर्स, आर्ट) फक्त मुलींकरिता

P.B. BSC NURSING
पात्रता : GNM

B.Sc. Nursing
4 वर्ष पदवी अभ्यासक्रम
पात्रता : HSC (सायंस) PCB ग्रुप मध्ये 45%
MH B.Sc Nursing CET
जागा : 40

ANM/GNM/B.Sc.(N)
शासन निर्णयानुसार शिष्यवृत्ती लागू



अधिक महितीकरीता संपर्क
टिप : शासकीय निकषानुसार स्कॉलरशिप लागू ANM, GNM व BASIC B.Sc. (नर्सिंग) करिता
9561537762, 9130645861


'कृषी– गुणनियंत्रण'मधील अधिकाऱ्यांचे लागेबांधे, 'सुधांशू' समितीच्या अहवालातील वास्तव, अधिकाऱ्यांच्या नातलगातील कंपन्या

कंपन्यांच्याआडून निविष्ठांचे 'ब्लॅकमार्केट'

केशव सवळकर

यवतमाळ : अन्नदात्याच्या घामासह अश्रूंचाही सौदा करणारे अधिकारी कृषी विभागात दडले आहेत. जानेवारी २०२६ मध्ये सुधांशू समितीच्या अहवालाने कृषी विभागातील काही अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या निविष्ठा उत्पादक कंपन्यांशी असलेले साटेलोटे उघडकीस आणले. एका सेवानिवृत्त कृषी अधिकाऱ्याने यवतमाळात चक्क निविष्ठा उत्पादक कंपनी थाटली असून अशा ४० हून अधिक अधिकाऱ्यांनी राज्यात नातलगांच्या माध्यमातून स्थापलेल्या कंपनीआडून निविष्ठाविक्रीचे ब्लॅकमार्केट सुरू केले आहे.

शेतकरी आत्महत्यांमुळे विदर्भाची भूमी धगधगते आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. एका बाजूला निसर्गाची अवकृपा, हमीभावासाठीचा संघर्ष आणि कर्जबाजारपणाच्या दाढेत पिसलेला शेतकरी हतबल असताना, दुसऱ्या बाजूला कृषी विभागातील अधिकारी स्वत:चे खिसे भरण्यासाठी बेनामी कंपन्या चालवून शेतकरी कुटुंबांच्या उध्वस्त होण्यावर आपली साम्राज्ये उभी करत असल्याचे वास्तव पुढे येत आहे.शासनाचे वरिष्ठ सनदी अधिकारी निरंजनकुमार सुधांशू समितीच्या अहवालातील धक्कादायक वास्तव कृषी विभागाच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह लावणारे आहे. राज्याच्या कृषी विभागातील गैरव्यवहारांची पाळेमुळे किती खोलवर रुजली आहेत, याची प्रचिती १० जानेवारी २०२६ रोजी शासनाला सादर झालेल्या सुधांशू समितीच्या अहवालाने आणून दिली आहे. या उच्चस्तरीय चौकशीत कृषी निविष्ठा (खते, बियाणे, कीटकनाशके) खरेदी आणि अनुदान वितरणात सुरू असलेला प्रचंड घोटाळा उजेडात आला आहे.नियमांचे उल्लंघन करत कृषी विभागातील ४० हून अधिक अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी आपल्या पत्नी, मुले किंवा जवळच्या नातेवाईकांच्या नावावर



बोगस कंपन्या स्थापन केल्याचे या अहवालात उघड झाले आहे. विशेष म्हणजे, जे गुणनियंत्रण निरीक्षक शेतकऱ्यांना मिळणाऱ्या खत–बियाण्यांचा दर्जा तपासण्यासाठी नेमलेले आहेत, तेच अधिकारी स्वत: पडद्यामागून कंपन्यांचे मालक बनून बाजारात निकृष्ट आणि अनधिकृत निविष्ठांचा मारा करत होते. शासकीय योजनांचा निधी थेट स्वत:च्या नातेवाईकांच्या कंपन्यांकडे वळवून, शेतकऱ्यांच्या नावावर कोट्यवधी रुपयांची लूट चालवली गेली आहे. राज्य शासनाने या प्रकरणी आता दोषींवर विभागीय चौकशीसह गंभीर प्रकरणांत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग व आयकर विभागामार्फत दंडात्मक कारवाईचे निर्देश दिले असले, तरी या भ्रष्टाचाराचे विळखे विदर्भातील बळीराजाच्या मुळावर उठले आहेत.

'त्या' अधिकाऱ्यांची मालमत्ता जप्त करा

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या कलम ३ आणि १२ चे थेट उल्लंघन करून खासगी व्यवसाय चालवणाऱ्या अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांना केवळ बदलीची शिक्षा पुरेशी नाही. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ आणि बेनामी व्यवहार प्रतिबंधक कायद्यांतर्गत या अधिकाऱ्यांच्या मालमत्ता जप्त करून त्यांना कठोर कारावासाची शिक्षा होणे गरजेचे आहे.

वेदनांची कहाणी अहवालात बंदिस्त

जिल्ह्याला शेतकरी आत्महत्यांचे केंद्र म्हणून दुर्दैवी ओळख लाभली आहे. आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या वेदनांची कहाणी आजवर शेकडो पानांच्या अहवालात बंदिस्त झाली, पण व्यवस्थेची संवेदनशीलता जागी झाली नाही. जेव्हा शासन दरबारी बसलेले यंत्रणेचे शिलेदारच शेतकऱ्यांच्या अनुदानातून आणि निविष्ठांच्या खरेदीतून स्वत:च्या तिजोऱ्या भरतात, तेव्हा यंत्रणेवरील लोकांचा विश्वासच उडून जातो.

बोगस निविष्ठांचा वणवा

एकिकडे शासकीय अधिकारी बेनामी कृषी निविष्ठा कंपन्यांच्या माध्यमातून नफेखोरी करत असताना दुसरीकडे शेतकरी मात्र बोगस बियाणे आणि मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक असलेल्या कीटकनाशकांच्या कात्रीत सापडला आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयाने मानवी आरोग्य आणि पर्यावरणाचा धोका लक्षात घेता मोनोक्रोटोफॉस, फोरेट, डायक्लोरव्हॉस यासारख्या अनेक घातक कीटकनाशकांवर पूर्ण वा अंशत: बंदी घातली आहे. यवतमाळ जिल्ह्यात गेल्या काही वर्षांपासून बोगस बियाणे, खते व कीटकनाशकांचे ब्लॅकमार्केट फोफावले आहे. जिल्ह्यात मोनोक्रोटोफॉस विक्रीचे वास्तव तपासण्याची गरज उभी झाली आहे.

...तर सरकारवरील विश्वास उडेल

फक्त पोर्टल– मशीन किंवा पोर्टलच्या घोषणा करून शेतकऱ्यांचे शोषण थांबणार नाही. जोपर्यंत कृषी विभागातील या सुधांशू समितीच्या अहवालात उघड झालेल्या दोषी अधिकाऱ्यांवर थेट बडतर्फ आणि अटकेची कारवाई होत नाही, तोपर्यंत विदर्भाच्या मातीतील आत्महत्यांच्या चिंतेवर फुंकर बसणार नाही.शेतकऱ्याचा आक्रोश आता केवळ निसर्गाच्या लहरीपणाविरुद्ध नाही, तर प्रशासनाच्या आणि खुद्द कृषी विभागाच्या भ्रष्ट व्यवस्थेविरुद्ध आहे. जर यंत्रणाच बळीराजाच्या पाठीत खंजीर खुपसत असेल, तर कायद्याच्या राज्यावरचा जनतेचा विश्वास डममगेल.

बायोस्टिम्युलंटचा गोरखधंदा थांबेना!

महाराष्ट्र शासनानेही जैव–उत्तेजकांमधील फसवणूक रोखण्यासाठी कडक निर्बंध आणले आहेत; परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या पातळीवर भरारी पथकांची कागदी घोडी नाचत असताना ग्रामीण भागातील छोट्या दुकानांतून सर्रास बोगस निविष्ठा विकल्या गेल्याची उदाहरणे आहेत. केंद्र शासनाने बंदी लादलेल्या अनेक बायोस्टिम्युलंटची विक्री जिल्ह्यात जोमात सुरू असून त्यावर निर्बंध लावण्यात कृषीची यंत्रणा फेल ठरली आहे.

बळीराजाची व्यथा ऐकेना कुणी

जेव्हा एखादा शेतकरी कर्ज काढून, खतांसह बियाण्यांच्या पोत्यांवर भरभक्कम पैसे खर्च करून आपली जमीन कसतो अन् ऐन हंगामाच्या वेळी बोगस किंवा निकृष्ट बियाण्यांमुळे संपूर्ण पीक जळून जाते, तेव्हा त्याच्या आयुष्याची सगळी पुंजी मातीत मिळते. मात्र, त्याची ही व्यथा लोकप्रतिनिधीसह प्रशासनातील अधिकाऱ्यांनाही कळेनाशी झाली आहे.

हास्यटोला



सुरेश राऊत (सुदंश)

न्यूज Crime



तरुणाच्या डोक्यावर काठीने वार

यवतमाळ : सार्वजनिक चौकात दारू पिऊन नागरिकांना विनाकारण शिवीगाळ करणाऱ्या व्यक्तीला जाब विचारणे एका तरुणाला महागात पडले. विरोध केल्याच्या रागातून आरोपीने तरुणाच्या डोक्यावर काठीने वार करून जखमी केले. ही घटना दिग्रस तालुक्यातील तिवरी येथे १५ नोव्हेंबरला सायंकाळी ६.३० वाजता घडली. सौरभ शिवाजी सांगवे (२६) रा. तिवरी, ता. दिग्रस असे फिर्यादीचे नाव आहे. तर प्रफुल्ल महादेव सावळे (३०) रा. तिवरी असे गुन्हे दाखल झालेल्याचे नाव आहे. सौरभ हा घराकडे जात होता. त्यावेळी चौकात प्रफुल्ल हा दारू पिऊन नागरिकांना विनाकारण शिवीगाळ करीत होता. सौरभने या प्रकाराला विरोध करून आरोपीला जाब विचारला. याचा राग आल्याने प्रफुल्लने त्याला शिवीगाळ केली. त्यानंतर मागून येऊन काठीने डोक्यावर वार करून जखमी केले. याप्रकरणी तक्रारीवरून दिग्रस पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

वडकी पोलिसांची तत्पर कारवाई, हिंगणघाटमधून घेतले ताब्यात

बेपत्ता मुलींचा २४ तासात शोध

शंकर जोगी

राळेगाव : आई–वडिलांनी रागावल्यामुळे घरातून निघून गेलेल्या खैरी येथील दोन अल्पवयीन मुलींचा वडकी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत शोध घेत त्यांना सुखरूप ताब्यात घेतले. पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे दोन्ही मुलींच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला असून, वडकी पोलिसांच्या या कामगिरीचे परिसरात कौतुक होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, १४ नोव्हेंबर २०२६ रोजी खैरी येथील दोन अल्पवयीन मुली आई–वडिलांनी रागावल्यामुळे घरातून निघून गेल्या होत्या. बराच वेळ होऊनही मुली घरी परतल्या नसल्याने कुटुंबीय चिंतेत पडले. अखेर मुलींच्या वडिलांनी १५ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास वडकी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.या तक्रारीवरून वडकी पोलीसांनी गुन्हे नोंदवून ठाणेदारांनी तातडीने शोधमोहीम हाती घेतली. पोलिसांनी विविध दिशांनी तपासाची चक्रे फिरवत उपलब्ध माहितीच्या आधारे शोध घेतला. अखेर हिंगणघाट येथून दोन्ही अल्पवयीन मुलींचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले. अवघ्या २४ तासांच्या आत दोन्ही मुलींना सुखरूप ताब्यात घेण्यात आल्याने कुटुंबीयांनी सुटकेचा निःश्वास सोडला. या यशस्वी कारवाईत वडकी पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुखदेव भोरकडे, पोलीस उपनिरीक्षक प्रकाश देशमुख, पोलीस कॉन्स्टेबल अमोल चौधरी, अविनाश चव्हाण, विनोद मोतेराव तसेच महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

१९ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

नायगावात शेतशिवारात गांजाची लागवड

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : जिल्ह्यात काही ठिकाणी गांजाची लागवड झाल्याच्या घटना यापूर्वी स्थानिक गुन्हे शाखेने उघडकीस आणल्या आहे. नायगाव येथील शेतात गांजाची लागवड केल्याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी त्या ठिकाणी धाडी घालून गांजाची झाडे जप्त केली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत पाचपेक्षा अधिक कारवाया गुन्हे शाखेने केल्या, हे विशेष.



दारव्हा पोलीस स्टेशन हद्दीतील मौजे नायगाव येथील शेतशिवारात मिलचंद आत्माराम राठोड यांनी आपल्या शेतात गांजा या अमली पदार्थाच्या * पान ४ वर

मोकाट श्वानांचा सुळसुळाट

यवतमाळ : नगरपरिषदेच्या बेफिकीर कारभारामुळे शहरात सर्वच प्रभागात मोकाट श्वानांचा सुळसुळाट वाढला आहे. अनेक श्वानांच्या टोळ्या पहाटेला दुचाकीस्वारांसह फिरायला जाणाऱ्या नागरिकांच्या मागे लागत असल्याची स्थिती आहे. त्याउपरही नगरपरिषदेकडून कुठल्याही उपाययोजना केल्या जात नसल्यानेसंतापव्यक्तहोत आहे.प्रामुख्याने आर्णी मार्गावर मटणाच्या दुकानाजवळ या श्वानांच्या टोळ्या वावरतात. तेथून जाणाऱ्या दुचाकीस्वारांचा पाठलाग करतात. त्यामुळे अनेकदा अपघाताच्या घटनासुद्धा घडल्या आहे.

१२९ कोटींचा टंचाई आराखडा, आजवरची ऐतिहासिक तरतूद

४७३१ गावे–वाड्यांवर जलसंकटाची चिन्हे

जलजीवन मिशनच्या योजना फोल, जलसंधारण कामांचेही फलित दिसेना !

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : दुष्काळ हा केवळ राजकारणापुरताच मर्यादित उरत नसून राजकीय लोकप्रतिनिधी, अधिकारी अन् कंत्राटदारांच्या फायद्याचा ठरतो. इतिहासात आजवर पाणीटंचाईचा आराखडा कधी १५ कोटींच्या वर गेला नसताना अल–निनोच्या संकटामुळे तो चक्क १२९ कोटी २६ लाख २० हजारांवर पोहोचला आहे. तब्बल चार ७३१ गावे अन् वाड्यांवर जलसंकटाची चिन्हे उमटली असून काल रात्रीच जिल्हाधिकाऱ्यांनीच या आराखड्यावर स्वाक्षरी करून तो आयुक्तांकडे रवाना केला आहे.

महाराष्ट्राने १९७२ चा अन्नधान्याचा दुष्काळ बघितला. त्यानंतर दुष्काळ निवारण्यासाठी १९७७ मध्ये रोहयो कायदा आला. मात्र, रोहयोत पुढाऱ्यांच्या चेलेचपाट्यांसह कंत्राटदारांनी 'अर्धे तुम्ही, अर्धे आम्ही, रोजगार हमी'अशी योजनेची अवस्था केली. २००५ मध्ये रोहयोचा राष्ट्रीय कायदा आला. त्यातही त्याच पद्धतीने कंत्राटदारांनी मजुरांची ही योजना ओरबाडून टाकली. जलसंधारणाच्या योजनांची मालिका राबविण्यात आली. मात्र, कोट्यवधी खर्चूनही भूगर्भातील जलपातळी जैसे–थेच राहिली. यंदा * पान ४ वर



टंचाई आराखडा दृष्टिक्षेपात

ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७ या कालावधीसाठी जिल्ह्यातील चार हजार ७३१ गावे व वाड्यांकरिता १० हजार २९२ उपाययोजनेसाठी १२९ कोटी २६लाख २० हजारांची तरतूद टंचाई आराखड्यात केली आहे. १६ नोव्हेंबरला जिल्हाधिकाऱ्यांनी हा आराखडा विभागीय आयुक्तांकडे पाठविला आहे. ६९५ गावांत ७५६ विंधन विहिरींसाठी सहा कोटी ६५ लाख नऊ हजार, ९२ गावात तात्पुरत्या पूरक नळयोजनांसाठी ११ कोटी ८३ लाख, नळयोजना विशेष दुरुस्तीसाठी ३०१ गावांकरिता २६ कोटी ९३ लाख, १०५ गावांतील २६७ विंधन विहीर दुरुस्तीसाठी २९ लाख ४५ हजार,३११५ गावातील ३२२१ विहीर अधिग्रहणासाठी १७ कोटी ४० लाख १६ हजार, ४२३ गावातील ४७२ विहीर खोलीकरणासाठी नऊ कोटी ४४ लाख, ८६३ गावात टँकर पाणीपुरवठ्यासाठी २९ कोटी ७१ लाख, २७० गावात स्त्रोत बळकटीकरणाच्या चार हजार ३२० उपाययोजनांसाठी २७ कोटी तरतूद आहे.

जानेवारी ते जून टप्प्यासाठी काय ?

टंचाई आराखड्यात जानेवारी ते मार्च या कालावधीत जिल्ह्यातील १५७८ गावे व वाड्यांमधील दोन हजार १७० उपाययोजनांकरिता ३३ कोटी २४ लाख पाच हजारांची तरतूद केली आहे. तर तिसऱ्या एप्रिल ते जून या टप्प्यामध्ये १४०३ गावांकरिता १९६३ उपाययोजनांसाठी २४कोटी आठ लाख ५० हजारांची तरतूद आहे.

११२८ कोटींच्या मलनि:सारण योजनेचा घाट

१६९.३१ कोटींच्या स्वहिश्यासाठी पालिकेची बैठक, २० नोव्हेंबरला बैठकीत घमासानची चिन्हे

केशव सवळकर

यवतमाळ : अमृत पाणीपुरवठा आणि आधीच्या भूमिगत गटार योजनेच्या नावाखाली कोट्यवधी निधी खर्ची घालून संपूर्ण शहराची चाळण करणाऱ्या यवतमाळ नगरपरिषद प्रशासनाने आता आणखी एका महाकाय योजनेचा घाट घातला आहे. महाराष्ट्र नागरी पाणीपुरवठा, स्वच्छता व पुनर्वापर कार्यक्रमांतर्गत शहरात एक हजार १२८ कोटी ७३ लाखांच्या भुयारी मलनि:सारण योजना टप्पा–३ राबविण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी आणला आहे. मात्र, या योजनेसाठी नगरपरिषदेला स्वत:च्या तिजोरीतून तब्बल १६९.३१ कोटी रुपयांचा (१५ टक्के) * पान ४ वर



प्रस्तावित योजनेचे आकडेवारीतील वास्तव

शहराची वाढती लोकसंख्या व विद्यमान मलनि:सारण यंत्रणा अपुरी असल्याने आधुनिक व शाश्वत मलनि:सारण व्यवस्था निर्माण करणे आवश्यक असल्याचे पालिकेने म्हटले आहे. योजनेचा डीपीआर मजिप्राकडे ३० मार्च २०२६ रोजी सादर केला. हा प्रकल्प शासनाच्या महाराष्ट्र नागरी पाणीपुरवठा, स्वच्छता व पुनर्वापर कार्यक्रमाअंतर्गत राबविला जात आहे. वर्ल्ड बँकेच्य सहाय्याने राबविल्या जाणाऱ्या या प्रकल्पात १० एप्रिल २०२६ रोजी मान्यता दिली. २८ सप्टेंबर २०२६ च्या अधिसूचनेनुसार यवतमाळात हा प्रकल्प राबविण्यास ग्रीन सिग्नल मिळाला आहे.

कोणती कामे केली जाणार ?

प्रकल्पांतर्गत शहरात मलवाहिन्यांचे जाळे विकसीत करणे, पंपिंग स्टेशन, सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणे, घरगुती मलजोडण्या उपलब्ध करून देणे, प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे प्रस्तावीत आहे. मलवाहिन्या टाकण्यासाठी शहरात विविध रस्त्यांवर खोदकाम करणे आवश्यक आहे. त्यामुळे रस्त्याचे नुकसान होण्याची शक्यता विचारात घेऊन रस्त्याच्या दुरुस्तीसाठी डीपीआरमध्ये निधीची तरतूद आहे.

मुख्याधिकाऱ्यांवर आक्षेपांची जंत्री

मध्यंतरी काँग्रेसच्या एका नगरसेवकाने मुख्याधिकारी शुभम क्यातमवार यांच्या जात प्रमाणपत्रासह विकासात्मक मुद्यांवरही अनेक प्रश्न उपस्थित केले होते. मात्र, पुढे हे मुद्दे सरकले नाहीत. क्यातमवार हे एका राजकीय नेत्यांच्या इशाऱ्यावरच काम करतात असा नगरसेवकांचा आरोप होता. दरम्यान विकास कामातील टक्केवारी, मर्जीतील कंत्राटदारांचा धुमाकूळ, कामांची ढासळलेली गुणवत्ता अशा आक्षेपांची जबाबदारीही मुख्याधिकाऱ्यांवर येते. मात्र, सध्या विरोधी पक्षातीलच काही नगरसेवकांना कंत्राटे मिळाल्याची चर्चा असून त्यामुळे सत्ताधाऱ्यांविरुद्ध बोलायला आता कुणीच तयार नसल्याचीही चर्चा वाढली आहे.

सभागृहात विरोधाची चिन्हे

आगामी सर्वसाधारण सभेत १६९.३१ कोटींच्या या प्रस्तावाला तत्त्वत: मान्यता देण्याचा मुद्दा ऐरणीवर असून, यावरून सभागृहात मोठा हंगामा होण्याची चिन्हे आहेत.

खड्ड्यांचे ग्रहण संपेना

यापूर्वी अमृत योजनेच्या पाइपलाइनसाठी आणि भूमिगत गटार योजनेसाठी शहरभरातील सिमेंट आणि डांबरी रस्ते खोदण्यात आले. कोट्यवधी रुपये खर्चूनही आजतागायत शहरातील अनेक रस्ते पूर्ववत झालेले नाहीत. नागरिक आजही धुळीचे लोट आणि खड्ड्यांचा त्रास सहन करत आहेत. अशातच टप्पा–३ अंतर्गत मलवाहिन्या टाकण्यासाठी पुन्हा नव्याने रस्ते खोदले जाणार आहेत.

रस्ते सुधारण्याच्या आश्वासनावर विश्वास बसेना

नगरपरिषदेने प्रस्तावात सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये रस्ते दुरुस्ती व पुनर्स्थापनेसाठी आर्थिक तरतूद केल्याचा दावा केला आहे. मात्र, आधीच्याच योजनांचे रस्ते न सुधारणाऱ्या प्रशासनाच्या या आश्वासनावर विश्वास कसा ठेवायचा, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

सत्ताधारी नगरसेवकाचे प्रशासनाला खडेबोल

विशेष म्हणजे, या प्रस्तावाला विरोधकांपेक्षा सत्ताधारी गटातील सहकारी पक्ष असलेल्या शिवसेनेच्या नगरसेवकांनीच कडाडून विरोध दर्शवत घरचा आहेर दिला आहे. शहरातील जुन्या योजनांची कामे अपूर्ण असताना आणि नगरपरिषदेकडे स्वत:चा वाटा देण्यासाठी निधी नसताना घाईघाईने ही सभा का बोलावली जात आहे? असा सवाल करत शिवसेना नगरसेवकांनी या संपूर्ण प्रक्रियेवर संशय व्यक्त केला आहे.

निरोगी बालविश्व: काळाची गरज!

राष्ट्रीय बालकदिन हा दिवस केवळ बालकांच्या आनंदाचा, हक्कांचा आणि स्वप्नांचा उत्सव नाही, तर त्यांच्या आरोग्याचा आणि भविष्याचा गांभीर्याने विचार करण्याचा दिवस आहे. देशाचे उद्याचे भविष्य असलेल्या बालकांचे बालपण निरोगी, आनंदी आणि निकोप असणे आवश्यक आहे. मात्र, बदलत्या काळात बालकांच्या आरोग्यापुढे अनेक नवी आव्हाने उभी राहत आहे. एका बाजूला कुपोषणाची समस्या कायम असताना दुसऱ्या बाजूला लठ्ठपणा, मधुमेह, मानसिक ताण आणि जीवनशैलीशी संबंधित आजार बालवयातच डोके वर काढत आहे. बालकांच्या आरोग्याचे हे बदलते चित्र चिंताजनक मानल्या जाते.

देशातील बालकांसमोर कुपोषण हा आजही अतिगंभीर प्रश्न आहे. गरिबी, आर्थिक विषमता, अज्ञान, सकस आहाराचा अभाव आणि आरोग्य सुविधांपर्यंत पोहोचण्याच्या अडचणींमुळे अनेक बालकांची शारीरिक व बौद्धिक वाढ अपेक्षेप्रमाणे होत नाही. वयानुसार कमी उंची रक्तक्षय आणि रोगप्रतिकार शक्तीचा अभाव यामुळे बालकांच्या विकासावर परिणाम होतो. बालपणी मिळणारे पोषण हे संपूर्ण आयुष्याच्या आरोग्याचा पाया असतो. त्यामुळे कुपोषणाकडे केवळ अन्नाची कमतरतेचे प्रश्न म्हणून न पाहता, सार्वजनिक आरोग्याच्या समतोलाच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. दुसरीकडे, शहरीच नव्हे तर ग्रामीण भागातही बालकांमध्ये लठ्ठपणाची समस्या वाढत आहे.फास्टफूड, पॅकेजिंग खाद्यपदार्थ, चिप्स, बिस्किट चॉकलेट,शीतपेये आणि साखरयुक्त पदार्थ मुलांच्या आहाराचा भाग बनत आहे. जाहिरातींच्या प्रभावामुळे अशा पदार्थांचे आकर्षण वाढते. घरगुती सकस आहारापेक्षा चटकदार पदार्थांना पसंती मिळत आहे. याचा परिणाम लठ्ठपणा, उच्च रक्तदाब आणि टाईप-टू,मधुमेह सारख्या आजारांच्या वाढत्या धोक्यापासून दिसून येते. आजच्या डिजिटल युगात मोबाईल, सोशल मीडिया, टॅब, टीव्ही, व्हिडिओ



गेम्स् हे बालकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. तंत्रज्ञानाचा योग्य वापर उपयुक्त असला तरी त्याचा अतिवापर शारीरिक, मानसिक आरोग्यासाठी घातक ठरू पाहत आहे. तासन्तास मोबाईलच्या स्क्रीनसमोर बसून राहिल्यामुळे शारीरिक हालचाली कमी होतात. डोळ्यावर ताण येतो, झोपेचे तंत्र बिघडते आणि एकाग्रतेवर परिणाम होऊ शकते. त्यामुळे आजच्या काळात बालकांसाठी डिजिटल डिटॉक्स ही संकल्पना महत्त्वाची बनली आहे. म्हणजेच ठरावीक वेळ मोबाईल, टीव्ही, आणि इतर डिजिटल उपकरणांपासून दूर राहणे होय. बालकांना जेवण करत असताना मोबाईल न वापरणे, झोपण्यापूर्वी स्क्रीनपासून दूर राहणे आणि दररोज काही वेळ डिजिटल उपकरणाशिवाय वेळ घालवणे, अशा सवयी पालकांनी मुलांमध्ये रुजवायला हव्यात. आज डिजिटल डिटॉक्सला मैदानी खेळाची जोड देणे आवश्यक आहे. क्रिकेट,कबड्डी, खो-खो, फुटबॉल, धावणे, सायकलिंग आणि पोहणे यासारख्या खेळांमुळे मुलांचा शारीरिक विकास होतो. स्नायू मजबूत होतात. हाडांची वाढ चांगली होते. लठ्ठपणाचा धोका कमी होतो आणि संघभावना व नेतृत्वगुण विकसित होतात. खेळामुळे मुलांचा ताणतणावही कमी होतो. दुर्दैवाने मैदानी कमी होत आहे आणि उपलब्ध मैदानाऐवजी मुलांचा अधिक वेळ मोबाईलच्या आभासी जगात खर्च होत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी शाळा व स्थानिक स्वराज्य संस्थांनी खेळाच्या मैदानाचे संरक्षण आणि क्रीडा सुविधांची उपलब्धता यांना प्राधान्य द्यायला हवे.याशिवाय मुलांमध्ये वाढणारा मानसिक ताण, अभ्यासाचे दडपण,स्पर्धा, एकटेपणा आणि सोशल मीडियाचा प्रभाव याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. मुलांना पुरेशी झोप, मोकळा संवाद, खेळण्यासाठी वेळ आणि भावनिक आधार मिळणे आवश्यक आहे. याची जबाबदारी कुटुंबाची आहे. कुपोषण आणि लठ्ठपणा हे परस्पराविरोधी वाटणारे प्रश्न असले तरी दोन्हींच्या मुळाशी असंतुलित पोषण आहे. याकडे मुलांना केवळ पोटभर अन्न नव्हे, तर सकस आणि संतुलित आहार मोहीम मिळणे महत्त्वाचे आहे. आहारात डाळी, कडधान्य दूध, फळे आणि हिरव्या पालेभाज्यांचा समावेश असावा. शाळांमध्ये पोषण शिक्षण, नियमित आरोग्य तपासणी आणि शारीरिक शिक्षणावर विशेष भर दिला पाहिजे. राष्ट्रीय बालदिनाच्या निमित्ताने बालकांच्या आरोग्याचा व्यापक विचार करण्याची गरज आहे. मुलांच्या हातात खेळाचे साहित्य द्यावे. स्क्रीन समोरील वेळ कमी करून मैदानावरचा वेळ वाढवावा आणि जंकफूडऐवजी सकस खाद्यांची सवय लावावी. यासाठी पालक, शाळा, समाज आणि शासन या सर्वांनी सामूहिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. आज बालकांना केवळ डिजिटल जगाचे ज्ञान देऊन चालणार नाही. तर त्यांना निसर्गाच्या सानिध्यात खेळणारे, धावणारे आणि निरोगी आयुष्य जगणारे बालपणही द्यावे लागेल. कारण बालपण निरोगी असेल तरच, राष्ट्राचे भविष्य सदृढ आणि समृद्ध होईल!

शशिकांत तोटे
दारव्हा,जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८


का व्यरस

'युगे अठ्ठावीस'

लहानपणापासून ऐकत आलोय.
म्हटलं जरा बघू तरी काय विशेष असतं
या खडासनात?
पाय जुळविले.
पावले सरळ.
पावलात अंतर अजिबात नाही.
ताठ उभा राहिलो.
हात कमरेवर विठुस्टाईल.
नजर समोर...
ती स्थिर राहायला तयार नाही.
मग डोळे मिटले.
आठवलं...
तो विठू आत्मस्थ नजर लावलेला आहे...
मीही मिटल्या डोळ्यातील नजर आत खेचली...
ती ओढाळ वासरासारखी स्वैर ...
मिटल्या डोळ्यामागे!
तुम्हाला सांगतो...
एक मिनीटही तोल स्थिर राहात नव्हता...
भिरभिरती अंतरनजर.
विचार मुक्त, पिसाट!
आणि हा बाबा विठू...
मिनिटभर नव्हे,
युगे अठ्ठावीस असा अवघडल्या स्थितीत!
आणि पहा...
पुन्हा याच्या मुखावर 'मोनालीशी' स्मित!
गवसेल आम्हाला तो आत्मानंद?
विठ्ठल विठ्ठल

India Poverty: दारिद्र्य घटले? खयाल अच्छा है

जागतिक बँकेचा 'पॉव्हर्टी अँड इक्विटी ब्रिफ, ऑक्टोबर २०२६' हा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. त्याने भारतातील तसेच भारताबाहेरील विरोधकांसह भारतीय सत्ताधाऱ्यांनाही क्षणभर धक्का बसला असावा. विशेष म्हणजे, भारत सरकारनेच जागतिक बँकेच्या या अहवालाची भलामण केली. सन २०११ ते २०२३ या काळात भारतात जगातील सर्वाधिक वेगाने दारिद्र्य कमी झाल्याचा दावा या अहवालात करण्यात आला आहे. त्यामुळे त्याचे आर्थिक विश्लेषण करणे आवश्यक ठरते.



जागतिक बँकेने मध्यम उत्पन्न देशांसाठी दारिद्र्यरेषा प्रतिदिन उत्पन्न प्रतिव्यक्ती ४.२० डॉलर म्हणजे आजच्या विनिमय दरानुसार साधारण ३८७ रुपये, अशी धरली आहे. या निकषानुसार २०११ ते २०२३ या काळात भारतातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण ५७.७ टक्क्यांवरून १६.१२ टक्क्यांपर्यंत कमी झाले. यामुळे सुमारे ४ कोटी ९६ लाख लोक दारिद्र्यातून बाहेर पडल्याचे जागतिक बँक सांगते. प्रतिदिन प्रतिव्यक्ती ३ डॉलर, म्हणजे साधारण २८४.५३ रुपये या आत्यंतिक दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण २७.१ टक्क्यांवरून २.६ टक्क्यांपर्यंत कमी झाल्याचेही अहवालात म्हटले आहे. एखाद्या देशातील गरिबी कमी होणे हा त्या देशाच्या प्रगतीचा महत्त्वाचा पैलू मानला जातो. मात्र गरिबी मोजण्याची साधने, निकष आणि पद्धती समजून घेतल्याशिवाय अशा निष्कर्षांचे आकलन अपुरे राहते. स्वातंत्र्यपूर्व काळात दादाभाई नवरोजी यांनी सर्वप्रथम भारताच्या गरिबीकडे ब्रिटिशांचे लक्ष वेधले. ब्रिटिश राजवटीचा मुख्य परिणाम दारिद्र्य निर्मूलन नव्हे, तर दारिद्र्यनिर्मिती हाच होता. स्वातंत्र्यानंतर देशासमोर अन्न, वस्त्र, निवारा, शेती, उद्योग, तंत्रज्ञान, शिक्षण आणि भांडवलनिर्मिती अशा अनेक मूलभूत समस्या होत्या. नियोजन आयोगाने १९६२ मध्ये अधिकृत दारिद्र्य मापनाची सुरुवात केली. १९७१ मध्ये अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर आणि रथ यांनी दारिद्र्याच्या प्रश्नाची शास्त्रीय आर्थिक मांडणी केली. 'गरिबी हटाव' ही घोषणा देत इंदिरा गांधींनी सत्ता मिळवली. पुढे अलघ समिती, लकडावाला समिती, तेंडुलकर समिती आणि रंगराजन समिती यांनी दारिद्र्य मापनाच्या पद्धतीत वेळोवेळी बदल सुचवले.


तेंडुलकर समितीने २००९ मध्ये कॅलरीआधारित निकषांऐवजी उपभोग खर्चाची बास्केट आणि मिश्र संदर्भ कालावधी स्वीकारला. त्यानुसार २०११-१२ मध्ये दारिद्र्यरेषा ग्रामीण भागात ८१६ रुपये आणि शहरी भागात १,००० रुपये प्रतिव्यक्ती प्रतिमहिना अशी मोजली गेली. रंगराजन समितीने २०१४ मध्ये ग्रामीण भागासाठी ९७२ रुपये आणि शहरी भागासाठी १,४०७ रुपये प्रति व्यक्ती प्रति महिना अशी स्वतंत्र दारिद्र्यरेषा सुचवली. सध्या नीती आयोग, राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाने गोळा केलेल्या घरगुती उपभोग खर्चाच्या माहितीच्या आधारे दारिद्र्याचा अंदाज घेतो. ग्रामीण विकास मंत्रालय विविध कल्याणकारी योजनांसाठी बीपीएल जनगणनेच्या आधारे गरीब कुटुंबांची ओळख पटवते. भारतात दारिद्र्य कमी करण्यासाठी अनेक अमौद्रिक उपाययोजना राबविल्या गेल्या. आवास योजना, वीज योजना, मनरेगा, थेट लाभ हस्तांतरण, अन्नसुरक्षा, आरोग्य योजना आणि अन्नधान्य अनुदान या उपायांमुळे गरीब कुटुंबांच्या मूलभूत गरजांना काही प्रमाणात आधार मिळाला. १९९१ नंतर उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरणाच्या धोरणांमुळे अर्थव्यवस्थेत झिरपणारा परिणामही हळूहळू दिसू लागला. जागतिक बँकेच्या मते, २०१८ ते २०२३ या काळात सुमारे ४ कोटी ९६ लाख लोक दारिद्र्यरेषेबाहेर येण्यात या योजनांचा महत्त्वाचा वाटा आहे. बहुविध गरिबीचे प्रमाणही २००५-०६ मधील ५३.८ टक्क्यांवरून २०२२-२३ मध्ये १५.५ टक्क्यांपर्यंत घटल्याचे बँक सांगते. ही घट वस्तू व सेवांच्या उपभोगातील वाढ, रोजगारात- विशेषतः महिलांच्या रोजगारात - झालेली वाढ, थेट लाभ हस्तांतरण आणि कल्याणकारी योजनांमुळे झाल्याचे सांगितले जाते. ग्रामीण-शहरी दरी कमी होत असल्याची नोंदही अहवालात आहे. तरी ग्रामीण गरिबीचे मुख्य कारण शेतीव्यतिरिक्त इतर उत्पादनक्षम उद्योग आणि रोजगाराच्या मर्यादित संधी हेच आहे. जागतिक बँकेने भारत सरकारच्या कौटुंबिक उपभोग खर्च पाहणी अहवालाचा आधार घेतला आहे. बहुविध दारिद्र्य निर्देशांकासाठी सुधारित मिश्र संदर्भ कालावधी वापरला जातो. यात सात दिवस, तीस दिवस आणि ३६५ दिवसांच्या उपभोगाचा संदर्भ घेतला जातो; परंतु उपभोग खर्चावर आधारित सर्वेक्षणात काही मूलभूत दोष असतात. स्मृती कालखंड वेगवेगळे असल्याने चुकीची माहिती मिळू शकते. सधन कुटुंबांचे प्रतिनिधित्व कमी राहते. शहरी आणि ग्रामीण वर्गीकरणही अनेक ठिकाणी कालबाह्य झाले आहे. शहरालगतच्या उपनगरांना ग्रामीण मानके लागू केली, तर निष्कर्षात विसंगती निर्माण होते. याशिवाय उपभोग्य वस्तूंची बास्केटही अनेकदा कालबाह्य असते. मोबाइल डेटा, खासगी आरोग्यसेवा, शिक्षणाचा वाढता खर्च यापेक्षा खाद्यपदार्थांना अधिक महत्त्व दिले जाते. आजचा स्मार्टफोन आणि दहा वर्षांपूर्वीचा साधा मोबाइल यांची तुलना एकाच चौकटीत करणे योग्य नाही. मोफत अन्नधान्य योजनांचा परिणामही मोजताना अडचण निर्माण होते. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेतून ८० कोटी लोकांपर्यंत अन्नधान्य पोहोचते, असे सांगितले जाते. लोकांचा रोखीचा अन्नखर्च कमी झाला, म्हणून ते आपोआप दारिद्र्याबाहेर आले, असे मानणे धोकादायक ठरू शकते. विषमतेचा प्रश्नही गंभीर आहे. जागतिक बँकेच्या अहवालानुसार २०२३मध्ये सर्वोच्च १० टक्के कामगारांचे सरासरी वेतन तळातील १० टक्के कामगारांच्या वेतनाच्या १३ पट अधिक होते. ऑक्सफॅमच्या उत्पन्न विषमता अहवालानुसार देशातील १ टक्का लोकांकडे देशाच्या सुमारे ४० टक्के संपत्तीचे केंद्रीकरण आहे, तर १० टक्के लोकांकडे ५८ टक्के उत्पन्नाचा हिस्सा जातो. जागतिक बँकेने भारताचा गिनी सहगुणक २३ दाखवला असला, तरी तो उत्पन्नावर नव्हे, तर उपभोग खर्चावर आधारित आहे. उपभोग उत्पन्नापेक्षा अधिक समसमान दिसतो, कारण गरीब कुटुंबांनाही मूलभूत गरजांवर खर्च करावाच लागतो. रोजगाराचा प्रश्नही बिकट आहे. सुशिक्षित आणि अशिक्षित दोन्ही घटकांसमोर स्थायी रोजगाराचे संकट आहे. त्यामुळे गिग अर्थव्यवस्थेचा विस्तार झपाट्याने होत आहे. मात्र, हा स्थिर रोजगाराचा पर्याय नाही. २०२६ मध्ये १५ ते २९ वयोगटातील तरुणांमध्ये बेरोजगारी सर्वाधिक आहे. ग्रामीण भागात ती सुमारे ८.३ ते १३.१ टक्के, तर शहरी तरुणांमध्ये १३.६ ते १७.९ टक्के आहे. भारतातील दारिद्र्यरेषेच्या संकल्पना नव्याने तपासायला हव्यात. उत्पन्न, उपभोग, किमतीतील बदल, आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि संपत्तीची उपलब्धता या सर्वांचा विचार करून नवी दारिद्र्यरेषा निश्चित केली पाहिजे. जागतिक बँकेचा दारिद्र्य निर्मूलन अहवाल भारत सरकारने स्वीकारला, तसेच भूक निर्देशांक, सुख निर्देशांक, लोकशाही निर्देशांक यांसारखे इतर आंतरराष्ट्रीय अहवालही खुल्या मनाने स्वीकारले पाहिजेत. प्रश्नांचे वस्तुनिष्ठ संशोधन, आंतरराष्ट्रीय संस्थांची मदत, तज्ज्ञांचा सहभाग आणि प्रामाणिक अंमलबजावणी झाली, तर भारताला विकसित देश होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही; अन्यथा गालिबच्या शब्दांत म्हणावे लागेल - 'हमें भी मालूम है जन्नत की हकीकत, लेकिन दिल के खूश रखने को गालिब ये खयाल अच्छा है...'

डॉ. सतीश श्रीवास्तव
(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

शिक्षणदर्जा व बेरोजगारी

निवडणुकीच्या वेळी आपल्या जाहीरनाम्यामध्ये सर्वच राजकीय पक्ष बेरोजगारी कमी करण्याचे आश्वासन देत असतात. देशातील तज्ज्ञ आणि विचारवंत या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी आपापल्या परीने सूचना करीत असतात. व्यावसायिक शिक्षण, रोजगाराभिमुख शिक्षण, लोकसंख्या कमी करणे, आरक्षण देणे इ. अनेक सूचनांचा त्यात समावेश असतो. यासंबंधात आणखी एक सूचना अनेकदा येत असते की, आपल्या देशातील शिक्षणाचा दर्जा उंचवावा म्हणजे तरुणांना नोकऱ्या मिळणे सोपे होईल. याचा साधा अर्थ असा की, देशातील निकृष्ट, दर्जाहीन शिक्षण हे सुशिक्षित बेरोजगारीचे एक मुख्य कारण आहे. या कारणाचे सविस्तर परीक्षण आपण या लेखात करणार आहोत. आपल्याकडे बौद्धिक आणि तांत्रिक असे दोन प्रकारचे शिक्षण दिले जाते. आर्ट्स, साय़न्स हे बौद्धिक प्रकारचे; तर इंजिनीअरिंग, मेडिसिन, टर्नर, फिटर इ. शिक्षणास तांत्रिक म्हणता येईल. तांत्रिक शिक्षण घेतलेले बहुतेक जण आपापल्या विषय़ास अनुरूप व्यवसाय किंवा नोकरी करतात. बौद्धिक शिक्षण घेणारे बहुतेक जण विविध प्रकारच्या कार्यालयांमध्ये प्रशासनाचे काम करतात. प्रत्येक ठिकाणचे प्रशासन वेगळे असते. उदाहरणार्थ, सरकारी कार्यालये, बँका, पोस्ट, वाहतूक, विद्यालये इत्यादींमधील प्रशासन वेगवेगळे असते. बेरोजगारी मात्र सगळीकडेच आहे; परंतु मुख्य मुद्दा असा की, या सुशिक्षित बेरोजगारीला देशातील दर्जाहीन शिक्षण जबाबदार आहे. आता या सिद्धांताला पूरक असा पुरावा आणि आकडेवारी आहे की कसे, हे पाहू. भारतातील शिक्षणाचा खराब दर्जा हे जर बेरोजगारीचे कारण मानले किंवा निदान प्रमुख कारण मानले तर त्यामुळे कित्येक प्रश्न उद्भवतील. त्यांना समर्पक उत्तर देणे अवघड होईल.

युरोप, अमेरिका, जपान इ. देशांतील शिक्षण उत्कृष्ट आहे, असे भारतामध्ये मानले जाते. मग, असे उत्कृष्ट शिक्षण असताना त्या त्या देशांमध्ये वेळोवेळी वाढत्या बेरोजगारीचा प्रश्न का उत्पन्न व्हावा? तेथील शिक्षण जगामध्ये सर्वोत्कृष्ट असूनसुद्धा सुशिक्षित युरोपियन, अमेरिकन तरुणांना त्यांच्याच देशामध्ये नोकरी का मिळू नये? डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारकिर्दीमध्ये भारतातून अमेरिकेमध्ये नोकरीसाठी येऊ इच्छिणाऱ्या तरुणांच्या संख्येवर अमेरिका काही बंधने घालेल अशा बातम्या आहेत. असे का व्हावे? भारतातील शिक्षण निकृष्ट असल्यामुळे जो मनुष्य भारतामध्ये नोकरीस अयोग्य आहे तो अमेरिकेतसुद्धा अयोग्यच असणार! मग भीती कशाची? याचे उत्तर अवघड आहे. वरील प्रश्नातूनच पुढचा प्रश्न उद्भवतो. भारतातील शिक्षण निकृष्ट असल्यामुळे उमेदवारास 'नोकरीस अयोग्य' बनविते असे मानले जाते. ठीक आहे, पण भारतातील अनेक राज्यांतून फिटर, वेल्डर, सुतार, अगदी सिव्हिल इंजिनीअरसुद्धा आखाती देशांमध्ये आणि क्वचित युरोपीय देशांमध्येसुद्धा नोकरी मिळवितो. सध्या भारतातील ड्रायव्हर लोकांना आणि इतर कुशल कामगारांना जर्मनीमध्ये मोठ्या प्रमाणावर मागणी आहे (म्हणजे नोकरी मिळणार) अशा बातम्या आहेत. याचे स्पष्टीकरण कसे देणार? जे शिक्षण भारतामध्ये निरुपयोगी ते परदेशी मात्र उपयोगी, भारतातील अयोग्य कामगार परदेशी मात्र योग्य असे मानायचे काय़? याशिवाय य़ुरोप अमेरिकेमध्ये अनेक शिक्षक, प्राध्यापक यांचे उच्च शिक्षण भारतातच झाले आहे हे विसरू नये. भारतामध्येच (तथाकथित) निकृष्ट शिक्षण घेऊन परदेशामध्ये नोकरी मिळविणाऱ्या भारतीयांमध्ये भाषा, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र इ. आर्ट्स साइडचे शिक्षण घेतलेल्या कामगारांचासुद्धा समावेश असतो. हे तरुण तेथे वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये कामे करतात हेसुद्धा लक्षात घ्यावे. भारतातील शिक्षण त्यांच्या नोकरीच्या आड येत नाही. याचा साधा अर्थ असा की, शिक्षणाचा दर्जा उत्तम असला की नोकरी मिळतेच असे नाही. शिक्षणाचा दर्जा आणि रोजगार यांचा संबंध नाही. असलाच तर अगदी अप्रत्यक्ष, दुरान्वयाने! मग रोजगार निर्माण होतात तरी केव्हा? एक गोष्ट स्पष्ट आहे की गुंतवणूक झाल्याशिवाय देशामध्ये रोजगार निर्माण होत नाहीत. शेती, उद्योग आणि सेवा या क्षेत्रांपैकी निदान एकातरी क्षेत्रामध्ये भरघोस गुंतवणूक झाली तर रोजगार निर्माण होतात. शिक्षणाचा दर्जा हे येथे कारणच नाही. सविस्तर पाहू! भारत १९४७मध्ये स्वतंत्र झाल्यानंतर १४ वर्षांनी, म्हणजे १९६१ मध्ये गोवा स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर गोव्यामध्ये मोठ्या प्रमाणावर शाळा, महाविद्यालये स्थापन झाली. तसेच सरकारने नोकर भरती सुरू केली. परिणामी, गोव्यातील तसेच बेळगाव, सावंतवाडी आणि इतर ठिकाणांतील तरुणांना गोव्यामध्ये पटापट नोकऱ्या मिळाल्या. येथे शिक्षणाचा दर्जा हा प्रमुख घटक नव्हता. जी काही नोकर भरती झाली ती त्यावेळच्या नियमाप्रमाणे झाली, पण रोजगार वाढले. त्यानंतर १९६९मध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण झाली. बँकांचा प्रचंड प्रमाणावर शाखाविस्तार झाला. त्यासाठी नोकरवर्ग आवश्यक होता. हजारो तरुणांना बँकांमध्ये रोजगार मिळाले. परंतु त्यावेळचे शिक्षण दर्जेदार होते अशातला भाग नव्हता. तरी नोकऱ्या मिळाल्या. त्याउलट २००८-०९ मध्ये जगभर आर्थिक मंदीसारखे वातावरण होते. गुंतवणूक वाढत नव्हती. अनेक युरोपीय देशांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी पसरली होती. स्पेनमध्ये तर २२ टक्के बेरोजगारी होती. जपानमध्येसुद्धा आर्थिक मंदी आणि बेरोजगारी होती. आता मात्र मंदी हटल्यानंतर गुंतवणूक आणि विकास वाढल्यामुळे परिस्थिती सुधारली आहे. बेरोजगारी सुसह्य झाली आहे. परंतु या सर्व घडामोडींमध्ये त्या त्या देशांतील शिक्षणाच्या दर्जाचा संबंध कुठेही दिसत नाही. पुन्हा भारतामध्ये ज्या शिक्षणाला नोकरीच्या बाजारात मागणी जास्त आहे तेथे भरपूर रोजगार व पगार आणि ज्या शिक्षणाला नोकरीच्या बाजारामध्ये कमी मागणी तेथे रोजगार आणि पगार दोनही कमी! उदाहरणार्थ, संगणक क्षेत्र आणि सॉफ्टवेअर क्षेत्र! परीक्षेचा निकाल लागल्याबरोबर कोठेतरी लवकरच नोकरी आणि उत्तम पगार! उलट स्थापत्य अभियंता (सिव्हिल) डिस्टिंक्शन असले तरी ताबडतोब नोकरी मिळेलच असे नाही. आणि पगार? संगणकाच्या मानाने कितीतरी कमी. हे सर्व दुर्दैवी असले तरी सत्य आहे ना? तेव्हा कामगारांना असलेली मागणी कमी जास्त असणे हेच बेरोजगारी कमी जास्त असण्याचे मुख्य; कदाचित एकमेव कारण दिसते. शिक्षणाच्या दर्जाला बेरोजगारीसाठी जबाबदार धरणे चूक आहे. गेल्या काही वर्षांमध्ये तर अगदी आयआयटीमध्येसुद्धा कॅम्पस प्लेसमेंट म्हणजे नोकऱ्या कमी झाल्या आहेत. पगारसुद्धा साठ ते सत्तर हजार एवढाच! मग आयआयटीला दर्जाहीन म्हणायचे काय? शक्यच नाही. तेव्हा सर्व प्रकारच्या बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी वाढती गुंतवणूक आणि जलद आर्थिक विकास हाच मार्ग आहे. दुसरा नाही. कोटा, आरक्षण या सर्व मलमपट्ट्या आहेत. याने मूळ प्रश्न सुटणार नाही. अर्थात, शिक्षणाच्या दर्जाबद्दल मी समाधानी आहे असे कृपया मुळीच समजू नये. दर्जा सुधारणे आवश्यक आहेच. परंतु केवळ दर्जा सुधारला की बेरोजगारी नाहीशी होईल, असे मात्र समजू नये. यासंदर्भात ज्येष्ठ अर्थतज्ञ वि. म. दांडेकर म्हणत असत की, 'इन इंडिया, इट इज नॉट द एज्युकेटेड हू इज अनएम्प्लॉइड, बट इट इज द अनएम्प्लॉइड हू इज बीइंग एज्युकेटेड.' (भारतामध्ये सुशिक्षित मनुष्य बेकार आहे असे नाही, तर जो आधीच बेकार आहे त्यालाच सुशिक्षित केले जात आहे.)



डॉ. अनिल पडोशी
(लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष आहेत.)

टिप : या लेखांमध्ये प्रकाशित होणारी मते लेखकांची आहे. त्याच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

थोडक्यात

पेन्शनधारकांसाठी डिजिटल जीवन प्रमाणपत्र मार्गदर्शन शिबिर

यवतमाळ : १९ व २० नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन डिजिटल तंत्रज्ञानामुळे हयात प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत सुलभता यवतमाळ : केंद्र शासनाच्या 'डिजिटल जीवन प्रमाणपत्र अभियान टप्पा-५' अंतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील निवृत्तीवेतनधारक किंवा कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी एका विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर १९ नोव्हेंबर रोजी, बळीराजा चेतना भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर व २० नोव्हेंबर रोजी जिल्हा नियोजन सभागृह, प्रशासकीय इमारत जिल्हाधिकारी कार्यालय परिसर येथे आयोजित करण्यात आला आहे. निवृत्तीवेतनधारकांना दरवर्षी सादर कराव्या लागणाऱ्या हयात प्रमाणपत्राच्या प्रक्रियेमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक सुलभता आणणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे. या मेळाव्यात केंद्र शासनाच्या 'जीवनप्रमाण' पोर्टलद्वारे डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष समजावून सांगण्यात येणार आहे. या मेळाव्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे उपस्थित निवृत्तीवेतनधारकांना प्रत्यक्ष डीएलसीचे प्रात्यक्षिक दाखवून, त्यांना त्यांच्या स्वतःच्या मोबाईलवर ही प्रक्रिया थेट कशी करावी, याचे थेट मार्गदर्शन व मदत केली जाणार आहे. यामुळे पेन्शनधारकांची होणारी धावपळ कमी होऊन ही प्रक्रिया अधिक सुलभ, जलद आणि सोयीस्कर होण्यास मदत होणार आहे. मेळाव्याला येताना पेन्शनधारकांनी आधार कार्ड, बँक पासबुक, पीपीओ नंबर, चालू मोबाईल संच (स्वतः जवळ ठेवणे अनिवार्य) ही कागदपत्रे व वस्तू सोबत आणणे आवश्यक आहेः डिजिटल जीवन प्रमाणपत्राच्या या सुविधेचा लाभ घेण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील जास्तीत जास्त निवृत्तीवेतनधारकांनी विहित तारखेला व वेळी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी राहुल गावकर यांच्याकडून करण्यात आले आहे.

एमपीएससीची परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने असावी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची मागणी

यवतमाळ : राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा ही केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धरतीवर वर्णनात्मक राहावी, अशी मागणी काही विद्यार्थ्यांकडून केल्या जात आहे. दरम्यान, अलीकडे ही परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीने घेतल्या जात आहे. एमपीएससी ने २०२२ मध्ये यूपीएससी आणि इतर राज्यांच्या धरतीवर मुख्य परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्यानुसार २०२५ पासून वर्णनात्मक पद्धतीने मुख्य परीक्षा घेण्यास अधिकृत सुरुवात झाली आहे. २०२१-२०२२ या वर्षात चंद्रकांत दळवी समितीने राज्यपत्रीत वर्ग अ तसेच ब पदासाठी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षा योजना वर्णनात्मक लेखी परीक्षा घेण्याची शिफारस केली होती. भारतीय रिझर्व बँक, नाबार्ड आणि इतर राष्ट्रीय संस्थांच्या निवड प्रक्रियेतही, वर्णनात्मक प्रश्नांचा समावेश असतो. अनेक सेवानिवृत्त सनदी अधिकाऱ्यांच्या मते, प्रशासकीय सेवेतील मुख्य परीक्षा वर्णनात्मक असावी जेणेकरून विद्यार्थ्यांच्या केवळ पुस्तकी ज्ञानाची नव्हे तर त्यांच्या वैचारिक अभिव्यक्तीची परीक्षा होईल. गेल्या दोन वर्षापासून वस्तुनिष्ठ पद्धतीचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आता अचानक परीक्षा वर्णनात्मक होणार असल्याची माहिती मिळाल्याने त्यांच्या मानसिकतेवर मोठा परिणाम झाला आहे. वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीमुळे अंदाज लावून उत्तरे लिहून कुणीही व्यक्ती भोकंमपट्टी करून पुढे येऊ शकतो. परंतु महाराष्ट्राला निर्णयक्षम कर्तव्य तत्पर आणि दिशादर्शक अधिकारी हवे असल्यास परीक्षा पद्धती वर्णनात्मक ठेवली पाहिजे, असे पालकांचे म्हणणे आहे. वर्णनात्मक प्रश्नांमुळे उमेदवारांची विचार प्रक्रिया, कार्य करण्याची तत्परता, निर्णय क्षमतेचे मूल्यमापन आणि लेखन कौशल्य उत्तम प्रकारे तपासल्या जाऊ शकते. अशी प्रतिक्रिया निवृत्त प्राध्यापक सुभाष कारूनिक यांनी व्यक्त केली.

मोफत तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

यवतमाळ : मुख्यमंत्री साहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय आणि पुणे येथील नेत्रसेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रोजेक्ट नयनतारा' अंतर्गत जिल्ह्यात तिरळेपणामुक्त अभियान राबविण्यात येत असून या अंतर्गत यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे बाह्यरुग्ण विभागात जिल्हास्तरीय मोफत तिरळेपणा तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पांतर्गत शुक्रवार २० नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे बाह्यरुग्ण विभागात (OPD) तिरळेपणा तपासणी शिबिर होणार आहे. तपासणीनंतर पात्र रुग्णांवर २१ व २२ नोव्हेंबर रोजी मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. या शिबिराचा लाभ लहान मुले, तरुण-तरुणी तसेच सर्व वयोगटांतील तिरळेपणाचा त्रास असलेल्या नागरिकांना घेता येणार आहे. विशेषतः १८ ते २५ वयोगटातील लग्न इच्छुक तरुण-तरुणी आणि विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. पुणे येथील नेत्रसेवा प्रतिष्ठानचे मुख्य नेत्रतज्ज्ञ व अध्यक्ष डॉ. मधुसूदन झंवर यांचा या शिबिरात सहभागी होणार आहेत. या प्रतिष्ठानने ४० वर्षांपासून अखंड नेत्रसेवा दिली असून, आतापर्यंत २५० निदान शिबिरे आणि २०३ शस्त्रक्रिया शिबिरे आयोजित केली आहेत. प्रतिष्ठानच्या लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये तीन वेळा नोंदी झाल्या असून, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्येही नोंद आहे. तिरळेपणाची समस्या असलेल्या लहान मुले, तरुण आणि नागरिकांनी २० नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या ओपीडीमध्ये उपस्थित राहून तपासणी करून घ्यावी. अधिक माहितीसाठी डॉ. प्रसाद बनसोड (9422169284), आनंद देशपांडे (9420201456) किंवा सुमित पारखे (8390023393) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तिरळेपणावर वेळीच उपचार घेऊन सुंदर दृष्टिचा आनंद मिळवावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

५ हजार लीटर क्षमतेचे अत्याधुनिक सक्शन व्हेईकल दाखल

उमरखेड : शहरातील सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्य व्यवस्था अधिक गतिमान व सक्षम करण्याच्या दृष्टीने, नगरपरिषद उमरखेडने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. शासनाकडून नगरपरिषदेच्या आरोग्य विभागास पाच हजार लीटर क्षमतेचे नवीन अत्याधुनिक सक्शन व्हेईकल प्राप्त झाले असून, या वाहनाचा लोकार्पण सोहळा, नगराध्यक्षा तेजश्री संतोष जैन यांच्या हस्ते सोमवार १६ नोव्हेंबरला मोठ्या उत्साहात पार पडला. नगरपरिषद कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमात नगरपरिषदेच्या अध्यक्ष तेजश्री संतोष जैन यांच्या हस्ते रिबन कापून व पूजन करून या नवीन वाहनाचे लोकार्पण करण्यात आले. या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी नगरपरिषदेचे सर्व पदाधिकारी, सर्व नगरपरिषद सदस्य, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी आणि सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील सेप्टिक टँक आणि भूमिगत गटारींच्या स्वच्छतेसाठी मोठ्या क्षमतेच्या वाहनाची गरज होती. आता पाच हजार लीटर क्षमतेचे हे नवीन सक्शन मशीन ताफ्यात दाखल झाल्यामुळे स्वच्छतेची कामे अधिक वेगाने, सुरक्षितपणे आणि मानवी हस्तक्षेपाशिवाय करणे शक्य होणार आहे. या सुविधेमुळे उमरखेड शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, शहर स्वच्छ व सुंदर राहण्यास मदत होणार आहे.

दारूबंदीसाठी शेकडो महिला रस्त्यावर उतरल्या

उभी बाटली आडवी करा अशा घोषणांनी परिसर दणाणला

लोकसूत्र प्रतिनिधी

आर्णी : तालुक्यातील तळणी येथे मनशांती बार बंद करण्याच्या मागणीसाठी आज शेकडो महिला रस्त्यावर उतरल्या. गावातील चौफुलीवर महिलांनी चक्काजाम आंदोलन करीत दारूबंदीची जोरदार मागणी केली. 'उभी बाटली आडवी करा', 'दारू हटवा, संसार वाचवा' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. या आंदोलनात केवळ महिलाच नव्हे, तर गावातील शेकडो पुरुष, ज्येष्ठ नागरिक आणि आजींचाही सहभाग होता. विशेष म्हणजे, राजकीय पक्षांचे मतभेद बाजूला ठेवून संपूर्ण गाव दारूबंदीच्या मागणीसाठी एकवटल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले. तळणी गावात यापूर्वी दारूचे दुकान नव्हते. मात्र, मनशांती बार सुरू झाल्यापासून गावातील महिला आणि पुरुष ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढत आहे. दारूमुळे सामाजिक शांतता आणि कौटुंबिक वातावरण बिघडण्याची भीती व्यक्त करीत महिलांनी बार बंद करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. अनेकदा निवेदने देऊन आंदोलने करण्यात आली. मात्र, दोन महिन्यांहून अधिक काळ उलटूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने महिलांचा संताप वाढला आणि आज शेकडो महिलांनी रस्त्यावर उतरून चक्काजाम आंदोलन केले. महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील तरतुदीनुसार महिला मंडळाचे 'आडवी बाटली' पद्धतीने मतदान घेऊन बार बंद करण्याची प्रक्रिया राबविण्यात यावी, अशी मागणी या प्रसंगी करण्यात आली. आजच्या आंदोलनात संपूर्ण गावाची



साथ मिळाली. गावातील विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आपापले पक्षीय मतभेद बाजूला ठेवून आंदोलनात सहभागी झाले. महिला आणि पुरुषांनी एकत्र येत बार बंद करण्याची मागणी लावून धरली. आंदोलनादरम्यान पोलिसांनी चौफुली परिसरात बंदोबस्त ठेवला होता. विशेष म्हणजे, गावकऱ्यांनी कोणताही अनुचित प्रकार घडू न देता अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने चक्काजाम आंदोलन पार पाडले. आता तरी प्रशासन जागे होणार काय? महिलांनी वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाकडून ठोस निर्णय होत नसल्याने आंदोलनाची वेळ आल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. महिलांचा एवढा मोठा विरोध असतानाही मनशांती बार सुरूच कसा, असा सवाल उपस्थित केला जात आहे. दारूमुळे कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होण्याची वेळ येण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने दखल घेऊन बार बंद करण्याची प्रक्रिया सुरू करावी. दारूची बाटली आडवी करण्यासाठी मतदानाची तारीख घोषित करावी तसेच लेखी पत्र ग्रामपंचायतला द्यावे अशी मागणी आंदोलकांनी केली. प्रचंड घोषणा देत दारूबंदीसाठी आज आंदोलन करण्यात आले. यापुढे मनशांती बार बंद न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा गावातील महिला पुरुषांनी दिला आहे. आता तळणीकरांच्या या आंदोलनानंतर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे आंतरराष्ट्रीय परिषदेचे शिलाँग येथे आयोजन

लोकसूत्र प्रतिनिधी



यवतमाळ : स्थानिक जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालय यवतमाळ, व्हीएमएस रीसर्च फाउंडेशन नागपूर व नॉर्थ ईर्स्टन हिल युनिव्हर्सिटी शिलाँग यांच्या संयुक्त विदयमाने १३ व १४ नोव्हेंबरला आंतरराष्ट्रीय परीषदेचे आयोजन नॉर्थ ईर्स्टन हिल युनिव्हर्सिटी शिलाँग येथे करण्यात आले आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेला सायन्स, टेक्नॉलॉजी याक्षेत्रातील विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय शास्त्रज्ञ व नामवंत व्यक्तींची उपस्थिती लाभणार आहे. आयोजीत आंतरराष्ट्रीय परिषदेत अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, कृषीशास्त्र, सोशल सायन्स व मॅनेजमेंट या विषयांवर संशोधन व शोध निंबध सादर करण्यात येणार आहे. या आंतरराष्ट्रीय परीषदेमध्ये देशातील १७५ व विदेशातील सुमारे १७ पेक्षा जास्त शास्त्रज्ञ, संशोधक व प्राध्यापक वृंद सहभागी होणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेला मुख्य पॅटरॉन म्हणून जगदंबा बहुउद्देशीय ग्रामिण विकास संस्थेचे सचिव डॉ. शीतल वातीले, प्रा.एस. के. बारीक, कुलगुरू, एनईएच युनिव्हर्सिटी शिलाँग, कांचन नितीन गडकरी, अध्यक्ष, श्रीराम शिक्षण संस्था रामटेक, जयकुमार देसाई, सचिव, शिक्षण प्रसारक मंडळ कोल्हापूर तसेच प्रमुख वक्ते म्हणुन आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त प्रा. जांनचाई इंगाप्राथुन डायरेक्टर प्रिन्स सोंगला युनिव्हर्सिटी सुरतथानी, थायलंड, डॉ. पंकज कोईनकर, डायरेक्टर इंटरनॅशनल कापेरिशन तोकोशिमा युनिव्हर्सिटी जपान आणि डी.जी.ओंग, हेल्प युनिव्हर्सिटी, मलेशिया असणार आहेत. या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये जागतिकस्तरावरील संशोधक आपले शोध निबंध सादर करणार असून आज रोजी कृषी विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात विदेशामधील अद्ययावत उपलब्धीबाबत भारतातील संशोधकांना ही माहिती आदान प्रदान होणार आहे. त्यावर भविष्यामध्ये संशोधन करून कृषी विज्ञान क्षेत्रामध्ये समाजोपयोगी उपकरणे व रसायनाची निर्मीती शक्य होऊन सर्व सामान्यांचे जीवनमान उंचावण्यास हातभार लागेल. संस्थेचे सचिव डॉ. शीतल वातीले यांनी या परिषदेव्दारे जे ज्ञान प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना प्राप्त होत आहे, ते त्यांनी वृध्दींगत करून सर्वच विद्यार्थ्यां पर्यंत पोहचावे असे आवाहन केले.

या परिषदेव्दारे विद्यार्थी व प्राध्यापकांना आंतरराष्ट्रीयस्तरावरील स्पर्धेत सहभागी होऊन आपले शैक्षणिक व तांत्रिक कौशल्य सादर करण्याची संधी प्राप्त झाली आहे. तसेच या परिषदेव्दारे विविध आंतरराष्ट्रीयस्तरावरील संशोधकांचे विचार, कौशल्य व ज्ञान आत्मसात करण्याची पर्वणी लाभणार असून सर्वाना त्याचा लाभ होणार आहे. अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय परिषदेच्या आयोजनाचा हेतू सफल होईल, असा आशावाद सचिव डॉ. शीतल वातीले यांनी व्यक्त केला.

खुल्या प्लॉटमध्ये सोडले सांडपाणी तक्रार देऊनही कारवाई नाही



लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : येथील वाघापूर टेकडी परिसरातील चिंतामणीनगरमधील खुल्या प्लॉटमध्ये परिसरातील नागरिकांनी थेट सांडपाणी सोडले आहे. दरम्यान, याची तक्रार मुख्याधिकारी नगरपरिषद यवतमाळ यांच्याकडे केल्यानंतर अद्यापही त्यावर कोणतीही कारवाई केली नसल्याने प्लॉटमालक आता उपोषणाला बसण्याच्या मार्गावर असल्याचे त्यांनी लोकसूत्रला सांगितले. चिंतामणी नगरातील नायरा पेट्रोलपंपामागील भागात असलेल्या लेआउटमधील प्लॉट क्र. ३३ शेत सर्वे नंबर ७/२ हा प्लॉट नितीन चरणदास घनमोडे यांच्या मालकीचा असून याच खुल्या प्लॉटमध्ये परिसरातील निवासी परिवारांनी सांडपाणी सोडले आहे. परिसरातील नागरिकांना पाणी न सोडण्याबाबत सूचित केल्यानंतर त्यांनी कोणतीही दखल घेतली नाही. शेवटी नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली. या तक्रारीला दोन महिन्याचा अवधी झाला असताना अद्यापही त्यांनी संबंधित प्लॉटधारकांना सांडपाणी वळिवण्यासंदर्भात किंवा न सोडण्याबाबत कोणतीही कारवाई केली नाही. गेल्या कित्येक वर्षापासून ही समस्या खुल्या प्लॉटमध्ये आहे. त्यामुळे परिसरातील काही परिवारांच्या घरात आरोग्य धोका निर्माण झाला आहे. नगरपरिषदेने हा विषय गंभीरपणे घेऊन संबंधिताना तत्काळ सांडपाणी थांबविण्यासंदर्भात आदेश द्यावे, अशी मागणी प्लॉटमालक नितीन घनमोडे यांनी केली आहे.

वसतिगृह प्रवेशासाठी मुदतवाढ नियमित विद्यार्थ्यांना २५ नोव्हेंबरपर्यंत ऑफलाइन प्रवेशाची संधी

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पं. दीनदयाळ उपाध्याय स्वयं योजनेंतर्गत व्यावसायिक व अव्यावसायिक नवीन विद्यार्थ्यांच्या ऑफलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी ३० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पं. दीनदयाळ उपाध्याय स्वयं योजनेचा लाभ घेण्यासाठी नियमित विद्यार्थ्यांना ऑफलाइन पद्धतीने प्रवेश घेण्यासाठी १३ नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. तसेच शासकीय वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पं. दीनदयाळ उपाध्याय स्वयं योजना या योजनेचा लाभ घेण्यासाठी नियमित (Existing) विद्यार्थ्यांना ऑफलाइन पद्धतीने प्रवेश घेण्यासाठी २५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे साहाय्यक संचालक दीपक मांटे हे करीत आहेत.

सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून रस्त्यांची कामे अर्धवट

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : भ्रष्ट यंत्रणेच्या दळभद्री कारभारावर राज्य शासनाने आसूड ओढला आहे. ग्रामीण भागातील रस्त्यांची चाळणी झाल्यानंतर ते दुरुस्त करण्याच्या संदर्भात शासनाने दोन महिन्यापूर्वीच आदेश दिला होता. यासाठी 'सेवा संकल्प अभियान' सुरू करण्याचे आदेश दिले होते. मात्र, अद्यापही जिल्ह्याभरात १०० टक्के काम झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे राज्य शासनाचा आदेश पायदळी तुडविला की काय, अशी शंका आता येऊ लागली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांचा जीव धोक्यात घालणाऱ्या आणि प्रशासकीय अनास्थेमुळे चाळण झालेल्या रस्त्याची बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. या संदर्भात अनेक तक्रारी गाव पातळीवरून थेट मुख्यमंत्री यांच्याकडे झाले आहेत. मुख्यमंत्र्यांनी याची दखल घेत दुरुस्तीचे आदेशच जारी केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेत तो राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाकडे रवाना केला होता. ग्रामविकास



विभागाने या अभियानांतर्गत प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या ग्रामीण भागातील रस्ते आणि पुलांची विशेष देखभाल, स्वच्छता, व तातडीची दुरुस्ती करण्यात यावी असे आदेश काढले होते. गेल्या काही वर्षापासून ग्रामीण भागातील अनेक रस्ते खड्ड्याच्या साम्राज्यात हरविले आहेत. पुलांची दुर्दशा झाली असून रस्त्याच्या कडेला वाढलेली झाडे झुडपे आणि अस्वच्छतेमुळे चालकांना नाहक जीवाला मुकावे लागत आहे. प्रशासनाच्या या डोळेझाक कारभारावर संतप्त प्रतिक्रिया उमटत असताना आता या अभियानाद्वारे रस्त्याचे रूप पालटण्याचा दावा केला जात असला तरी अद्यापही या कामात अपेक्षित असलेली प्रगती कुठेही दिसून येत नाही. रस्त्यावरील जीवघेणे खड्डे बुजवून तातडीने पॅचवरची कामे पूर्ण करावी, रस्त्याच्या कडा, बाजूची गटारे, तसेच स्वच्छता केल्या जावी. वाहनचालकाच्या सुरक्षेचा धोका निर्माण करणारी आणि दृश्य मानतेत अडथळा आणणारी झाडेझुडुपे तातडीने काढून चालकांना रस्ता दिसेल, या पद्धतीने काम करावे, अशा सूचना देण्यात आले आहेत. शासनाने आदेश दिल्याप्रमाणे या अभियानाद्वारे रस्त्याचे रूप पालटण्याची शक्यता वर्तविल्या जात आहे.

आदिवासी शबरी घरकूल योजनेसाठी ४ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याची मुदत

प्रतिलाभार्थी २ लाख ५० हजार रुपयांचे अनुदान ; नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रांत १७९ लाभार्थ्यांची आवश्यकता.

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : आदिवासी शबरी घरकूल योजना (शहरी) २०२५-२६ अंतर्गत निश्चित करण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. यवतमाळ नगरपरिषद तसेच बाभूळगाव, राळेगाव व कळंब नगरपंचायत क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या पात्र नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ४ डिसेंबरपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा यांच्यामार्फत करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत यवतमाळ नगरपरिषद क्षेत्रासाठी १५९, बाभूळगाव नगरपंचायतीसाठी १८, राळेगाव नगरपंचायतीसाठी १ आणि कळंब नगरपंचायतीसाठी १ अशा एकूण १७९ लाभार्थ्यांचे अर्ज आवश्यक आहेत. पात्र लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी प्रत्येकी २ लाख ५० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे.

योजनेसाठी पात्रतेच्या अटी

अर्जदाराचे वय किमान १८ वर्षे असावे. लाभार्थी अनुसूचित जमातीचा (ST) असावा. अर्जदाराच्या स्वतःच्या नावावर पक्के घर नसावे. घर बांधकामासाठी स्वतःची किंवा शासनाने दिलेली जमीन उपलब्ध असणे आवश्यक आहे. अर्जदार



महाराष्ट्र राज्यात किमान १५ वर्षांपासून वास्तव्यास असावा. यापूर्वी कोणत्याही शासकीय घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा. घरकूल बांधकामाचे चटई क्षेत्र २६९ चौरस फूट राहील. अर्जदाराचे स्वतःच्या नावाने आधार संलग्न बँक खाते असणे आवश्यक असून, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न कमाल ३ लाख रुपयांपर्यंत असावे.

आवश्यक कागदपत्रे

अर्जासोबत अर्जदाराचे अलीकडील दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, रहिवासी प्रमाणपत्र, अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र, घरकूल बांधकामासाठी जागा उपलब्ध असल्याचा पुरावा, तहसीलदार यांचा उत्पन्नाचा दाखला, शिधापत्रिका (रेशन कार्ड), आधार कार्ड तसेच रद्द केलेला धनादेश किंवा बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. बँक खात्याचा क्रमांक व छायाचित्र स्पष्ट दिसणे आवश्यक आहे.

येथे करा अर्ज सादर

इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी आपले अर्ज एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा किंवा नगरपरिषद यवतमाळ तसेच नगरपंचायत बाभूळगाव, राळेगाव व कळंब येथे सादर करावेत. अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत ४ डिसेंबरपर्यंत राहणार आहे.

संबंधित क्षेत्रातील पात्र अनुसूचित जमातीच्या नागरिकांनी विहित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

पान १ वरून

नायगावात शेतात बेकायदेशीर ...

झाडांची लागवड केली होती. याबाबतची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळताच पथक नायगाव शिवारामध्ये दाखल झाले. पथकाने पंचा समक्ष शेतातील ४४ झाडे ताब्यात घेतले. या झाडांची किंमत १९ हजार ४५० रुपये एवढी आहे. आरोपी मिलचंद राठोड यांच्याविरुद्ध दारव्हा पोलीसात अंमली औषधी व मन प्रभावी पदार्थ अधिनियम १८९५ च्या कलम ८ ब २० अनुसार गुन्हा नोंदविला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे, यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धीरज बांडे, पोलीस उपनिरीक्षक अमोल राठोड, मुन्ना आडे, सुभाष जाधव, रमेश राठोड, सुनील पडांगळे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रवींद्र श्रीरामे, राजेश जाधव यांनी पार पाडली.

४७३१ गावे–वाड्यांवर जलसंकट ...

तर ऐतिहासिक पाणीपातळी खालावली आहे. जलजीवन मिशनच्या १५३९ गावातील जवळपास १३०० कोटींच्या योजनांचे फलित काय, हा प्रश्नही उभा ठाकला आहे. त्यातच आता अल–निनोच्या प्रभावामुळे जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने ऐतिहासिक टंचाई आराखडा बनविला आहे. जिल्ह्यातील चार हजार ७३१ गावातील १० हजार २९२ उपाययोजनांसाठी तब्बल १२९ कोटी २६ लाख २० हजारांची तरतूद केली आहे. मुळात पाण्याची पातळी खोल गेली असताना या आराखड्यातील निधीतून पाणी येईल कसे, हा साधा प्रश्न व्यवस्थेला पडत नसल्याची खंत आहे.

ऑक्टोबर ते डिसेंबरसाठी ७१ कोटी

जिल्हाधिकारी विकास मीना यांनी मंजूर केलेला आराखडा हा तीन टप्प्यांचा आहे. प्रामुख्याने ऑक्टोबर ते डिसेंबर २०२६ या कालावधीसाठी जिल्ह्यातील एक हजार ७२३ गावात सहा हजार १५९ उपाययोजनांसाठी ७१ कोटी ९३ लाख ६५ हजारांची तरतूद केली आहे. एकीकडे खुद्द जिल्हाधिकाऱ्यांनी विंधन विहिरींच्या खोदमाकावर अधिसूचना काढून प्रतिबंध लावले. दुसरीकडे मात्र, विंधन विहिर कार्यक्रमासाठी ४८६ गावात ५२२ उपाययोजनांकरिता तब्बल चार कोटी ६६ लाख ८१ हजारांची तरतूद केली आहे. ३१ तात्पुरत्या पूरक नळयोजनांसाठी चार कोटी २१ लाख, नळयोजना विशेष दुरूस्तीसाठी २४८ गावांकरिता २३ कोटी ७३ लाख, ७६ गावातील २१८ विंधन विहीर दुरूस्तीसाठी २२ लाख १० हजार, ५७५ गावातील ५८१ विहीर अधिग्रहणासाठी तीन कोटी १३ लाख ७४ हजार, ३०७ गावातील ३५४ विहीर खोलीकरणासाठी सात कोटी आठ लाख, ७७ गावात टँकर पाणीपुरवठ्यासाठी तीन कोटी नऊ लाख, २५८ गावात स्त्रोत बळकटीकरणाच्या चार हजार १२८ उपाययोजनांसाठी २५ कोटी ८० लाखांची तरतूद आहे.

११२८ कोटींच्या मलनि:सारण ...

वाटा उभारावा लागणार असून तो येणार कुठून हा प्रश्न उभा ठाकला आहे.

यवतमाळ नगरपरिषदेत 'अंधेरनगरी, चौपट राजा' अशी अवस्था झाली आहे. नगरपरिषदेची आर्थिक कुवत नसताना तब्बल एक हजार १२८ कोटी ७३ लाखांच्या योजनेचा घाट घातला जात आहे. १६ नोव्हेंबरला नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके यांच्या स्वाक्षरीने नगरपरिषदेच्या विशेष सभेची नोटीस नगरसेवकांना पाठविली आहे. २० नोव्हेंबरला सायंकाळी ४ वाजता नगर भवनात केवळ महाराष्ट्र नागरी पाणीपुरवठा, स्वच्छता व पुनर्वापर कार्यक्रमाअंतर्गत शहरातील भुयारी मलनि:सारण योजना टप्पा–३ राबविण्यासाठी नगरपरिषदेचा सहभाग निश्चित करणे व आर्थिक हिस्सा उभारण्यास मान्यता मिळण्याबाबतची ही सभा आहे. मुळात या सभेवरून आता पालिकेतील सत्ताधारी पक्षातील काही नगरसेवकांनीच प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

नगराध्यक्ष आणि मुख्याधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आलेल्या कार्यालयीन टिप्पणीत या प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च एक हजार १२८ कोटी ७३ लाख रुपये दर्शविला आहे. यातील ८५ टक्के म्हणजे ९५९.४२ कोटी रुपये शासनाकडून (जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्यातून) अनुदान मिळणार असले, तरी उर्वरित १५ टक्के हिस्सा अर्थात १६९ कोटी ३१ लाख रुपये नगरपरिषदेला उभारावे लागणार आहेत. सद्यस्थितीत नगरपरिषदेची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक असताना एवढा मोठा निधी उभा करायचा कसा? यासाठी नगरपरिषदेला थेट कर्जच काढावे लागणार असून, त्याचा अप्रत्यक्ष बोजा यवतमाळकरांच्या कररूपाने खिशावर पडणार असल्याची चर्चा रंगली आहे.

आलिशान हॉटेलमध्ये वनहक्क समित्यांची कार्यशाळा, प्रत्यक्षात वनहक्क दाव्यांची स्थिती काय?

दुष्काळाच्या झळा ; पंचतारांकित थाटात वनजागर

केशव सवळकर

यवतमाळ : क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आणि जनजातीय गौरव सेवा सप्ताहाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालयासह पांढरकवडा व पुसद एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या वतीने आयोजित केलेली वनजागर कार्यशाळा आता चर्चेचा आणि टीकेचा विषय ठरली आहे. एकीकडे जिल्ह्यातील आदिवासीबांधव दुष्काळ, सिंचनाचा अभावाने हवालदिल झाले असताना दुसरीकडे प्रशासनाने ही जनजागृती कार्यशाळा एका प्रशस्त व आलिशान महागड्या हॉटेलमध्ये आयोजित करून जनतेच्या पैशांची उधळपट्टी केल्याचा सूर उमटत आहे.

राज्यात वनहक्क कायदा लागू होऊन अनेक वर्षे उलटली, तरी प्रत्यक्षात या योजनेत फारशी प्रगती झालेली नाही. आदिवासी कुटुंबांचे वैयक्तिक आणि सामूहिक वनहक्क दावे आजही लालफितीत अडकल्याच्या तक्रारी आहेत. जमिनीचे पट्टे मिळवण्यासाठी आदिवासीबांधवांचे चपला झिजत असताना वातानुकूलित आणि महागड्या हॉटेलमध्ये बसून वनहक्क कायद्याचे धडे देणे हा केवळ एक इव्हेंट ठरल्याची भावना व्यक्त होत आहे. जिल्ह्यात आदिवासी कुटुंबांची संख्या मोठी आहे. याउपरही आदिवासी विकासाच्या योजनांची



अवस्था गंभीर आहे. या कार्यशाळेच्या निमित्ताने पुसद आणि पांढरकवडा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांच्या आजवरच्या कामगिरीचा लेखाजोखा खरे तर माध्यमांपुढे मांडण्याची गरज होती. मात्र, माध्यमांना केवळ माहिती कार्यालयाच्या माध्यमातून आपल्या स्तुतीच्या बातम्या पाठविण्यात आदिवासी प्रकल्प विभाग धन्यता मानतो. प्रकल्प अधिकाऱ्यांची माध्यमातील जिल्हास्तरीय प्रतिनिधींसोबतही तोंडओळख सोडा, बोलण्याची ओळख नाही. त्यामुळे प्रकल्प विभागाच्या योजनाच खऱ्या अर्थाने निरक्षर आदिवासीबांधवांना ठाऊक होत नाहीत.

महागडे हॉटेल निवडण्याचे कारण काय?

राळेगावचे आ. प्रा. डॉ. अशोक उईके हे स्वतः राज्याचे आदिवासी विकास मंत्री आहेत. या कार्यशाळेला त्यांची प्रमुख उपस्थिती होती. मात्र, त्यांच्याच जिल्ह्यात आदिवासी विकास विभागाचे अधिकारी जर अशा प्रकारे महागड्या हॉटेल्समध्ये कार्यशाळा घेऊन विकास दाखवत असतील, तर इतर जिल्ह्यांत काय परिस्थिती असेल, असा सवाल उपस्थित होत आहे. मंत्री महोदयांनी कार्यशाळेत वनहक्क समित्यांमध्ये बदल करण्याच्या सूचना दिल्या खऱ्या, पण ज्या अधिकाऱ्यांवर ही जबाबदारी आहे, त्यांच्या कारभारात सुधारणा कधी होणार, हा खरा प्रश्न आहे.

आर्थिक सुधारणा कुठे?

कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊनही या पांढरकवडा व पुसद दोन्ही प्रकल्पांनी आजवर नेमक्या किती आदिवासी कुटुंबांच्या जीवनात ठोस आर्थिक सुधारणा घडवून आणली, हा संशोधनाचा विषय आहे. शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमधील मूलभूत सुविधांचे घोळ अद्याप संपलेले नाहीत. विद्यार्थ्यांना मिळणारे निकृष्ट दर्जाचे साहित्य, गणवेश आणि भोजन पुरवठ्यावरून होणारे वाद नित्याचेच झाले आहेत. न्यूक्लिअस बजेट, पारधी विकास, ठक्करबाप्पा यासह इतरही योजनांची फलश्रुती दोन्ही प्रकल्प अधिकाऱ्यांनी माध्यमांपुढे मांडण्याची गरज आहे.

मुख्यमंत्र्यांचे आवाहनच बेदखल

राज्यात दुष्काळी स्थिती असल्याने कुठल्याही कार्यक्रमावर आर्थिक उधळपट्टी करू नये, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवाहन केले होते. मात्र, प्रकल्प कार्यालयाने या आवाहनाला बेदखल ठरवित शहरातील प्रतिष्ठित महागड्या हॉटेलमध्ये कार्यशाळा भरवली. या कार्यशाळेवर नेमका किती निधी खर्च झाला, याचे वास्तवसुद्धा पुढे येणे गरजेचे आहे.

आत्मचिंतनाची गरज

कार्यक्रमात वनजागर पुस्तिकेचे विमोचन, बचतगटांना धनादेश वाटप आणि स्टॉलचे कौतुक झाले असले, तरी या झगमगाटामागे लपलेले कटू वास्तव नाकारता येत नाही. दुष्काळाच्या खाईत लोटल्या गेलेल्या आदिवासीबांधवांच्या टाळूवरचे लोणी खाण्यापेक्षा, प्रशासनाने या महागड्या कार्यशाळांमधून बाहेर पडून प्रत्यक्ष आदिवासी कुटुंबाच्या घरी आणि आश्रमशाळांमध्ये जाऊन आत्मचिंतन करण्याची नितांत गरज आहे.

पाच लाख ५४ हजारांचा अवैध दारूसाठा वाहनासह जप्त

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यावर वचक निर्माण करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोठी कारवाई केली आहे. मारवाडी चौक ते मदिना चौक परिसरात एका चारचाकी वाहनातून बिनापरवाना व अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतूक केली जात असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळताच या शाखेने सापळा रचून कारवाई केली. मदिना चौक परिसरात पोलिसांची संशयित महिंद्रा एक्सयूव्ही ५०० क्रमांक एम एच १५ एक्स ८८ ३८ ही गाडी अडविली. वाहनचालकाची व प्रवाशांची विचारपूस केल्यानंतर पंचासमक्ष गाडीची झडती घेण्यात आली. यावेळी वाहनाच्या मागील सीटवर इम्पेरियल ब्ल्यू, मॅकडॉल नंबर एक, रॉयल स्टॅग, ऑल सीजन, आयकॉनिक व्हाईट, एमएचएक व्हिस्कीच्या वेगवेगळ्या वाटल्या तसेच इम्पोरियल ब्ल्यू, ट्यूबग, कॅनोन, किंगफिशर स्ट्राँग आणि बडवायझर कंपनीच्या बिअरचे टीम बॉटल्स असा एकूण ५४२२० रुपयांचा दारूसाठा आढळून आला.

पोलिसांनी ५४२२० रुपयांचा दारूसाठा आणि पाच लाख रुपये किमतीची महिंद्रा कार असा एकूण पाच लाख ५४ हजार २२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. वाहनचालक अक्षय प्रदीप जयस्वाल (३३) रा. पिंपरी बुटी यवतमाळ आणि त्याच्या बाजूला सीटवरील प्रवीण वसंतराव कुळसंगे (२७) रा. कोळंबी या दोघा संशयिताविरुद्ध शहर पोलीस स्टेशनला महाराष्ट्र दारूबंदी कायदानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने केली.

हजारोंचा गुटखा पकडला

यवतमाळ: शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ मानवी आरोग्यास घातक आहे. त्याउपरही सुगंधित तंबाखू, पानमसाला व गुटख्याची सर्रास हेराफेरी केली जाते. दरम्यान, अन्न व औषध प्रशासन विभागाने दुचाकीस्वाराला पकडून त्याच्याकडून ५५ हजार ७७० रुपयांच्या तंबाखूजन्य पदार्थांचा साठा पकडला. ही कारवाई २४ सप्टेंबरला दुपारी १२.३० वाजता पुसद येथील वालतूर रोडवरील हनुमान मंदिराजवळ करण्यात आली. जगदीश पंढरीनाथ कापसे (२६) असे फिर्यादी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अन्नसुरक्षा अधिकाऱ्याचे नाव आहे. तर शेख जुबेर शेख असद (२६) रा. जांबबाजार असे गुन्हे दाखल झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी वसंतनगर पोलिसांनी गुन्हे नोंदविले आहेत.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ: राज्याच्याउच्चन्यायालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांना घेऊन यवतमाळ येथील न्यायालयीन कर्मचारी आक्रमक झाले असून सुधारित वेतन श्रेणीचा प्रस्ताव तात्काळ लागू करण्यात यावा या मुख्य मागणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप आजपासून सुरू केला आहे. राज्यातील दुय्यम न्यायालयामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन श्रेणीचा लाभ मिळावा यासाठी मागील काही काळापासून विविध स्तरावर पाठपुरावा करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ गट क, महाराष्ट्र स्टेट जुडीशियल स्टेनोग्राफर असोसिएशन, महाराष्ट्र राज्य न्यायालयीन बेलिप कर्मचारी महासंघ, आणि महाराष्ट्र राज्य न्यायालयीन गट ड कर्मचारी महासंघ यांनी यापूर्वीच संयुक्तपणे आंदोलनाची हाक दिली होती.

याच पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्हा न्यायालय आस्थापना वरील सर्व चारही कर्मचारी संघटनांनी राज्य महासंघाच्या निर्णयाला पूर्ण पाठिंबा दर्शविला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या धर्तीवर आणि राज्य संघटनेच्या निर्देशानुसार १७ नोव्हेंबर पासून जिल्ह्यातील सर्व कर्मचारी या संपात आणि आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी झाले आहेत.

संघटनांच्या या भूमिका मुळे यवतमाळ जिल्हा न्यायालयासह परिसरातील दुय्यम न्यायालयामधील दैनंदिन कामकाजावर विपरीत परिणाम झाला आहे. जिल्ह्यातील सर्व न्यायालयाचे कामकाज आज ठप्प झाले आहे. कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्या मान्य होईपर्यंत हा लढा सुरूच ठेवण्याचा निर्धार केला असून प्रशासकीय वतुर्ळातया संपामुळे खळबळ उडाली आहे. या संपाबाबत असोशियनने आपल्या मागणीचे निवेदन जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्याकडे दिले आहे.

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना दिल्या जात असलेले वेतन इतर न्यायालयीन कर्मचाऱ्यांना नियमानुसार देण्यात यावे याबाबत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने यापूर्वीच निर्णय घेऊन त्याबाबत अहवाल राज्य शासनाकडे दिला होता. या अहवालाला अनेक महिने उलटून गेलेत मात्र, शासनाने निर्णय घेतला नाही. परिणामी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उगारले आहे.

विविध संघटनांचा पाठिंबा

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला बार असोशियनने पाठिंबा दिला आहे. अशी माहिती यवतमाळ वकील संघाचे एडवोकेट संजय जैन, एडवोकेट मोहन गिरटकर, यांच्यासह बार असोसिएशन चे अध्यक्ष यांनी दिली. यासोबतच निवृत्त न्यायालयीन कर्मचारी महासंघ यांनीही आपला पाठिंबा दर्शविला असून त्यांनीही महात्मा ज्योतिबा फुले मुनिसिपल हायस्कूल समोर आज आंदोलन केले. जोपर्यंत हा प्रश्न निकाली निघत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील असा इशारा संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे.

कामकाज ठप्प

न्यायालयातील कामकाजासाठी आज अनेक जण यवतमाळ येथे न्यायालयात येऊन गेले, मात्र त्यांना संप असल्यामुळे आल्यापावलीच परत जावे लागले. कर्मचाऱ्यांच्या संपामुळे न्यायालयातील कामकाज प्रभावित झाल्याचे संघटनेने सांगितले.

नागरिकांच्या श्रद्धेपोटी मूकजनावरांच्या जीवाशी खेळ

किशोर जुननकर

यवतमाळ : शहरामध्ये अन्नाच्या शोधात रस्त्यावर फिरणाऱ्या मुक्या जनावरांना विशेषत: गायींना नागरिकांकडून श्रद्धेपोटी किंवा चुकीच्या दयेपोटी शिळ्या पोळ्या, गव्हाचा कोंडा, उरलेले तेलकट अन्न, खिचडी, भात, खायला घातला जात आहे. नागरिकांच्या या दूरदर्शी आणि चुकीच्या पद्धतीमुळे शेकडो गायींची प्रकृती धोक्यात आली असून त्यांचे आयुष्य आजारपणामुळे वेळेआधी संपत असल्याची अत्यंत संतापजनक बाब समोर आली आहे.

या गंभीर प्रकाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत गोपालक संजय खंडारकर यांनी संताप व्यक्त केला आहे. गाय आणि बैलांचे मूळ नैसर्गिक खाद्य कडबा, कुटार, हिरवा चारा, सरकी आणि ढेप असून याव्यतिरिक्त कोणतेही कृत्रिम किंवा तेलकट अन्न दिल्यास त्यांच्यामध्ये गंभीर



आजाराची नवी लक्षणे निर्माण होण्याची शक्यता आहे.

प्लास्टिकयुक्त अन्नामुळे मृत्यूचे तांडव अनेक नागरिक उरलेले अन्न थेट प्लास्टिकच्या पिशवीत टाकून रस्त्यावर फेकून देतात. भटकणारी जनावर ही प्लास्टिकच्या पिशवीसह त्यांना खाऊन फस्त करतात. त्यामुळे गेल्या वर्षभरात शेकडो गाईच्या पोटात प्लास्टिक साचून त्यांना अत्यंत वेदनादायी मृत्यू आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. भटक्या गायींना पकडून गौ संरक्षणामध्ये नेल्यानंतर तेथे त्यांना कडबा, कुटार, हिरवे गवत आणि शुद्ध पाणी पिल्या जाते; परंतु नागरिकांकडून पोळ्या खाण्याची सवय लागल्यामुळे या गायी गौ संरक्षण केंद्रातही गोड आणि चवदार चारा खाण्यासाठी नकार देतात. गो पशुपालक थोडाफार खाद्याचा घास देऊन मोकाट सोडलेले या गायी शहरात पुन्हा प्लास्टिकच्या विळख्यात अडकत आहे.

गायीचे मूळ खाद्य सोडून त्यांना कोणत्याही प्रकारची उरलेले अन्न किंवा पोळ्या खायला देऊ नये, असा सज्जड दम गोपालक संजय खंडारकर यांनी दिला आहे. नागरिकांनी अशा प्रकारे अन्न टाकून मूक जनावरांचे आयुष्य उद्ध्वस्त करू नये, त्याऐवजी मदत व देणगी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे. नागरिकांनी आपली वृत्ती बदलली नाही तर मुक्या जनावरांना जीव धोक्यात घालून आयुष्य संपण्यापूर्वीच मृत्यूला सामोरे जावे लागेल.

अनेक जनावरांचे आरोग्य धोक्यात

गावात भटकणाऱ्या गायींना पोळ्या किंवा रात्रीचे शिळे, तसेच दुर्गंधी येणाऱ्या पोळ्या देऊ नये, श्रद्धेपोटी अनेकजण ब्रेड, बिस्कीट, टोस्ट, हेसुद्धा देतात. मात्र, यामुळे गायीच्या पोटात फुगारा निर्माण होऊन वेगळा आजार निर्माण होऊ शकतो. विटलेले अन्न किंवा पोळ्या खाल्ल्यामुळे गाईच्या शेणाला आणि दुधाला दुर्गंधी येते. श्रद्धेपोटी गायींना देत असलेल्या अन्नाचा त्रास होत असेल तर ती श्रद्धा कुठल्या कामाची आहे. असा प्रश्नही पशुवैद्यकीय उपायुक्त डॉ. काळे यांनी उपस्थित केला. गायींना सरकी, ढेप, हिरवा चारा, कडबा, कुटार खाण्यासाठी द्यावा, असे आवाहन डॉ. काळे त्यांनी केले.

सुधारित वेतनश्रेणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप



पुसद : उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य समस्त न्यायालयीन कर्मचारी महासंघाने १७ नोव्हेंबरपासून राज्यव्यापी बेमुदत संप पुकारला आहे. या आंदोलनात जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेसह पुसद न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी न्यायालयासमोर संप सुरू केला आहे.

सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचा शासन निर्णय निर्गमित होईपर्यंत संप मागे न घेण्याची ठाम भूमिका कर्मचाऱ्यांनी घेतली आहे. या मागणीसाठी राज्यातील विविध न्यायालयीन कर्मचारी संघटना एकत्र आल्या आहेत. यामध्ये गट–क कर्मचारी महासंघ, लघुलेखक संघटना, बेलीफ संघटना आणि इतर न्यायालयीन कर्मचारी संघटनांचा सहभाग आहे.उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी मिळणे हा न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा हक्क असून, शासनाने या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली आहे.या बेमुदत संपामुळे पुसद न्यायालयातील नियमित कामकाजावर परिणाम झाला असून, विविध न्यायालयीन प्रक्रियांना अडथळा निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. शासनाकडून सुधारित वेतनश्रेणीबाबत ठोस निर्णय होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

निम्न पैनगंगा सिंचन प्रकल्पाचे काम जोमात

अरविंद चव्हाण

सावळी सदोबा : खडका–चिमटा अर्थात निम्न पैनगंगा या बहुचर्चित सिंचन प्रकल्पाने आता हजारो शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावण्याचे काम चालविले आहे. जन्मोजन्मीचे नाते–गोते, हेमाडपंथी मंदिरे, आजी–आजोबांच्या समाध्या आणि घामाने कमावलेली जमीन गिळंकृत करण्याचा घाट घातला, त्याच धरणाविरोधात पेटून उठलेली धरण विरोधी संघर्ष समिती आज अचानक गप्प का, सरकार बदललं, समितीची भूमिका बदलली, असे एक ना अनेक प्रश्न उभे ठाकले आहेत.

मागील काही महिन्यांपासून निम्न पैनगंगा सिंचन प्रकल्पाची काम युद्धपातळीवर, जोमाने सुरू आहे. १९९७ मध्ये या प्रकल्पाला तत्कालीन युती सरकारने मान्यता दिली होती. मात्र, ९५ गावे बुडित क्षेत्रात जात असल्याने या प्रकल्पाचा विरोध सुरू झाला. दोन लाख २८ हजार हेक्टर सिंचन क्षमतेचा हा प्रकल्प आता २५ हजार कोटींवर पोहोचला आहे. मध्यंतरी राज्य शासनाने या प्रकल्पाच्या कामाचे कंत्राट संचेती नामक कंत्राटदाराला दिले. त्यामुळे आता प्रकल्पाचे काम जोमात सुरू झाले. दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकरी एका थेंबासाठी भटकंती करत असताना, दुसरीकडे प्रशासन धरणाचे काम जोरात रेटत आहे.आश्चर्याची गोष्ट म्हणजे, याच काळात ज्या समितीने ''धरण होऊ देणार नाही'' अशी गर्जना केली होती, त्या समितीने आजपर्यंत एका शब्दानेही विरोध केलेला नाही. ना निवेदन, ना आंदोलन, ना जनतेसमोर खुलासा त्यामुळे धरणग्रस्त शेतकऱ्यांमध्ये एकच चर्चा – समिती आता विरोधात आहे की धरणाच्या समर्थनात असा सवाल आहे. हजारो शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर विदर्भ–मराठवाड्याच्या सीमेवरील हा प्रश्न आज एरणीवर आला आहे.

विरोधकांच्या मौनामुळे जनतेत संभ्रम



सांगा आम्ही जगायचे कसे?

शेतकरी विचारतोय–आमची जमीन गेली तर आम्ही जगायचं कसं?आमच्या आजी–आजोबांनी कमावलेली जमीन काही दिवसात जमीनदोस्त होणार का? आमची मंदिरे, आमच्या पूर्वजांच्या समाध्या पाण्याखाली जाणार का? या प्रश्नांना उत्तर द्यायला कोणीच तयार नाही. ज्या समितीवर शेतकऱ्यांनी विश्वास टाकला, तीच समिती आता तोंडाला कुलूप लावून बसली आहे. सरकार सत्तेत आल्यापासूनच मौन का, असे स्थानिकांचे स्पष्ट आरोप आहेत.

आज समितीचा विरोध का मावळला?

जोपर्यंत दुसरे सरकार होते, तोपर्यंत ही समिती रोज रस्त्यावर आंदोलन उपोषण गाज्यावाजा करत होती. नवीन सरकार सत्तेत येताच या समितीचा विरोध मावळला. यामागे राजकीय तडजोड आहे का? असा थेट सवाल आता शेतकरी करू लागले आहेत. 'आम्हाला आता कळेनासं झालंय, आमच्यासाठी लढणारे कोण अशी हतबल प्रतिक्रिया धरणग्रस्त शेतकऱ्याने दिली. एकूणच, धरणाचे काम जोमात आणि विरोधाची धार बोथट– या परिस्थितीत खडका–चिमटा धरणग्रस्त शेतकऱ्यांचे भवितव्य काय, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. समितीने आपली भूमिका तात्काळ स्पष्ट करावी, अन्यथा शेतकरी स्वतःचा लढा स्वतः लढेल, हे निश्चित!

हे पत्रक मालक, प्रकाशक, मुद्रक राहुल माणिकराव ठाकरे यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट नागपूर ४४००१८ येथे मुद्रित करून दै. लोकसूत्र 'शिवभवन' दत्तचौक यवतमाळ-४४५००१ येथे प्रकाशित केले. कार्यकारी संपादक केशव मारोतराव सवळकर (संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) (सर्व वाद यवतमाळ न्यायालया अंतर्गत) ई-मेल : loksutra@gmail.com